रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक २०९
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

घारापुरी बेटावर आज बम बम भोलेचा गजर/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

पीजेपीएलमध्ये डायमंड डेअरडेव्हिल संघ चॅम्पियन/८

## आसाममध्ये हायवेवर पीएम मोदींच्या विमान लँडिंगचा थरार



**दिसपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. १४) आसाममधील रणनैतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मोरान बायबास इमर्जन्सी लँडिंग फॅसिलीटीवर विमान लँड करून एक मोठा संदेश दिला आहे. नॅशनल हायवे १२७ वरील हा ४.२ किमीचा भाग पंतप्रधान मोदींच्या लँडिंगवेळी वापरण्यात आला. या हायवेचे पंतप्रधानांच्या हस्तेच उद्घाटन करण्यात आले आहे. त्याचबरोबर राफेल आणि सुखोई सू ३० एमकेआई फायटर जेट यांनीदेखील या हायवेवर आपली कर्तबगारी दाखवली. त्यांनी हा सामान्य हायवे काही मिनिटांतच एका उच्च लष्करी करवायतीमध्ये रूपांतरित केला. इमर्जन्सी लँडिग फॅसिलिटी अर्थात ईएलएफ हा एक पर्यायी रनवे असतो. हा थेट हायवेवर तयार करण्यात आलेली एक व्यवस्था असते. याचे डिझाईन हे भारतीय वायू दलाच्या समन्वयाने तयार केलेले आहे.

### काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडून टिपू सुलतानची शिवरायांशी तुलना

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला निषेध

**मुंबई : प्रतिनिधी**

मालेगाव महानगरपालिकेचे नवनियुक्त उपमहापौर शान-ए-हिंद निहाल अहमद यांनी आपल्या दालनात टिपू सुलतान फोटो लावल्याने वाद निर्माण झाला होता. वाद चिघळल्यावर त्यांनी तो फोटो दालनातून काढून टाकला. या वाद शमेल अशी अपेक्षा असतानाच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केली. या मुद्द्यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड भूमिका मांडली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ज्या प्रकारे टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांची केली आहे, या गोष्टीचा आम्ही निषेध करतो. त्यांना लाज वाटली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या विरोधात लढाई करून स्वराज्याची निर्मिती केली. दुसरीकडे हजारो हिंदूंची कत्तल करणाऱ्या टिपू सुलतान आहे. या दोघांना एकसमान आदर दिला जावा अशी जर काँग्रेसची मागणी असेल, तर मतांच्या लांगूलचालनासाठी या



लोकांनी कितीही बूट चाटले तरी महाराष्ट्र आणि देश अशा गोष्टी सहन करून घेणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

काँग्रेस पक्षात थोडी जरी नैतिकता शिल्लक राहिली असेल, तर पक्षनेतृत्वाने याची दखल घेतली पाहिजे तसेच काँग्रेसचे जे मित्रपक्ष आहेत, त्यांनी याबाबतची भूमिका काय आहे ती त्यांनी स्पष्ट केली पाहिजे. असे विधान करणारे लोक कोणत्या शाळेत इतिहास शिकले याचे संशोधन केले पाहिजे. जो नवा इतिहास हे लोक लिहू पाहतात, तो इतिहास महाराष्ट्र खपवून घेणार नाही, भारत खपवून घेणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी खडसावले

## पळसदरी स्टेशनजवळ गवत पेटल्याने खोपोली-कर्जत लोकलला लागला ब्रेक

**खालापूर, कर्जत : प्रतिनिधी**

खोपोली-कर्जत रेल्वेमार्गावरील पळसदरी स्टेशनजवळ रूळाच्या दोन्ही बाजूस गवत पेटल्याने मोटरमनने प्रसंगावधान राखत तत्काळ ब्रेक लावला आणि पुढील अनर्थ घडू नये यासाठी लोकल ५०० मिटर मागे घेत रोखून धरली.

पळसदरी स्टेशनजवळ लोहमार्गाच्या आसपास मोठ्या प्रमाणात असलेले गवत पेटल्याने परिसरात आगीचा भडका उडाला. त्याचवेळी खोपोलीहून १२.४० वाजता कर्जतकडे शटल जात होती, मात्र रेल्वेमार्गालगतच



आगीच्या ज्वाळा भडकल्याने मोटरमनने लोकल थांबवली. काही वेळाने आगीचा भडका कमी झाला. त्यानंतर लोकल पळसदरी स्टेशनवर थांबून कर्जतकडे रवाना झाली.

पळसदरी रेल्वे स्टेशन येथे नेमणुकीस असलेले होमगार्ड सचिन हिरवे, किशोर वीर, महिला होमगार्ड माधुरी खंडागळे व ट्रॅकमन यांनी आग विझवली. दरम्यान, ही आग जाणीवपूर्वक कोणी लावली की जंगलातील वणवा येऊन रेल्वेमार्गालगतचे गवत जळाले याबाबत काही समजू शकले नाही.

## मुलुंडमध्ये मेट्रोचा स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू; तीन जण जखमी

### मुख्यमंत्र्यांकडून घटनेच्या चौकशीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील मुलुंड पश्चिम परिसरात शनिवारी (दि. १४) दुपारी बांधकाम सुरू असलेल्या मेट्रोच्या स्लॅबचा काही भाग अचानक कोसळला आणि तो खालून जात असलेल्या रिक्षासह इतर वाहनांवर कोसळला. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले आहेत.

लाल बहादूरशास्त्री मार्गावर मेट्रोचे काम सुरू असताना सिमेंटच्या पिलरचा एक मोठा भाग १२ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास अचानक कोसळला. हा राडारोडा थेट चालत्या रिक्षासह बाजूने जाणाऱ्या कारवर पडला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन



दल, स्थानिक पोलीस आणि वॉर्ड कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत मदतकार्य सुरू केले.

या अपघातात रामधनी यादव (वय ५५) यांचा मृत्यू झाला, तर राजकुमार यादव (वय ४५), महेंद्रप्रताप यादव (वय ५२) आणि दीपा रुहिया (वय ४०) जखमी झाले आहेत. जखमींना मुलुंडमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील राजकुमार यादव यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत, तर उर्वरित दोघांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

### मृताच्या वारसांना पाच लाखांची मदत

या घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे मृताच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून (सीएमओ) देण्यात आली.

## सिंधुदुर्गवासीयांनी महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध केली

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे मालवणी जत्रोत्सवात गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्हा ही नगररत्नांची खाण असून त्यांनी आपल्या दशावतार, भजन इ. कला व खाद्यसंस्कृतीद्वारे महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध केली आहे, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाच्या वतीने आयोजित मालवणी जत्रोत्सवाच्या कार्यक्रमात ते शुक्रवारी (दि. १३) बोलत होते.

नवीन पनवेल येथील अंबामाता मंदिराजवळील मैदानात मालवणी जत्रोत्सव सुरू आहे. या जत्रोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महापौर नितीन पाटील, नगरसेवक समीर ठाकूर, अजय बहिरा, नगरसेविका रूचिता लोंढे, प्रीती जॉर्ज, माजी नगरसेवक प्रदीप




सावंत, युवा नेता मयूर शेळके आदींनी भेट दिली.

शिवरायांचा मराठी बाणा येथील रायगड ते सिंधुदुर्गापर्यंत टिकून आहे. ही संस्था कलाकार मंडळींना अशा प्रकारच्या कार्यक्रमातून व्यसपीठ उपलब्ध करून देत असते याचा आनंद असून आपल्यालाही मालवणी संस्कृतीचा अभिमान असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

महापौर नितीन पाटील यांनी सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाच्या सामाजिक कार्यात आपले सहकार्य सदैव राहील, असे आश्वासन दिले. या वेळी संघाचे अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष संतोष चव्हाण, सचिव बाप्पा मोचेमाडकर यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित महापौर व नगरसेवकांचा सत्कार केला. दरम्यान, या जत्रोत्सवात रविवारी (दि. १५) सायंकाळी ७ वाजता दशावतारी नाटक सादर होणार आहे. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन संघाच्या वतीने नाट्यरसिकांना करण्यात आले आहे.

## निवडक

### बंगळुरूमध्ये भीषण अपघातात सात जणांचा जागीच मृत्यू

**बंगळुरू :** येथील डोब्बासपेट-होसकोटे सॅटेलाइट टाउन रिंग रोडवर शनिवारी (दि. १४) एका १७ वर्षांच्या मुलाने अल्पवयीन मित्रांसह अतिवेगाने कार चालवत भीषण अपघात घडवला. यात सात जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये सहा विद्यार्थ्यांचा समावेश आहे. आधी हाय-स्पीड एसयूव्हीने समोरून जाणाऱ्या दुचाकीस्वार तरुणाला चिरडले. त्यानंतर ही कार पुढे चाललेल्या ट्रकला जाऊन धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, ट्रकचे एक्सल आणि चाके निखळून रस्त्यावर पडली.

### तरुणाने प्रेयसीला ठार करून स्वतःचाही घेतला जीव

**नोएडा :** 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी नोएडाच्या सेक्टर १०७ परिसरात एका बंद कारमध्ये ३२ वर्षीय तरुण आणि २६ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार त्या तरुणाने तरुणीवर गोळी झाडली आणि नंतर स्वतःवरही गोळी झाडून घेतल्याचा संशय आहे. अधिक तपास सुरू आहे.

## अलिबागमधील व्हायरल व्हिडीओवर ॲड. राहुल नार्वेकर यांचे स्पष्टीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

अलिबाग येथील म्हात्रोळी गावात जमिनीच्या वादातून हाणामारी झाली असून त्यात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मध्यस्थी केली. दरम्यान, याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून या हाणीमारीचा संबंध थेट राहुल नार्वेकरांशी जोडला जात आहे. शिवसेना उबाठा खासदार संजय राऊत यांनीही हा व्हिडीओ पोस्ट करून राहुल नार्वेकरांवर टीका केली, मात्र यावर थेट नार्वेकरांनीच खुलासा करून वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.

खासदार संजय राऊत यांनी शनिवारी (दि. १४) एक्सवर एक व्हिडीओ पोस्ट केला. या व्हिडीओमध्ये राहुल नार्वेकर दिसत आहेत. घरात कोणी नसताना नार्वेकर अधिकाऱ्यांसह जमिनीची मोजणी करायला गेल्याने तिथे



गोंधळ निर्माण झाला आणि यातून हाणामारी झाल्याचा दावा राऊत यांनी केला आहे.

या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एक्सवर पोस्ट करत त्यांची बाजू मांडली. त्यांनी म्हटले, आज सोशल मीडियावर माझ्याबाबत प्रसारित होत असलेल्या व्हिडिओ संदर्भात मी सत्य परिस्थिती स्पष्ट करू इच्छितो. मी परवा माझ्या शेतजमिनीवर जात असताना रस्त्यावर दोन शेतकऱ्यांमध्ये वाद होत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. त्या वेळी मी फक्त त्यांना शांतपणे वाद मिटवण्याचा सल्ला दिला आणि त्यानंतर माझ्या कामानिमित्त पुढे निघून गेलो. हा वाद किंवा त्या घटनेशी माझा कोणताही संबंध नाही. त्यामुळे विनाकारण माझे नाव त्या घटनेशी जोडू नये, ही नम्र विनंती.

### स्थानिकांनीही मांडली वस्तुस्थिती

दरम्यान, या घटनेतील स्थानिकांनीही या प्रकरणी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, राहुल नार्वेकरांचा जो व्हिडीओ व्हायरल झाला तो माझा आणि माझ्या सुनेतील भांडणाचा आहे. यात राहुल नार्वेकरांचा काहीही संबंध नाही. ते इथून जात असतानाच आमच्यात वाद झाले. उलट आमच्यातील वाद आपसात मिटवा, असे नार्वेकरांनी सांगितल्याची प्रतिक्रिया त्या जागेचे मालक रमेश पाटील यांनी दिली.

## टी-२० वर्ल्डकपमध्ये आज भारत-पाक हाय व्होल्टेज सामना

**कोलंबो : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सर्वात हाय व्होल्टेज सामना रविवारी (दि. १५) खेळवला जाणार आहे. श्रीलंकेतील कोलंबोत होणाऱ्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही आमनेसामने येणार आहेत. याआधी दोन्ही संघ आशिया चषक २०२५ स्पर्धेत आमनेसामने आले होते. या स्पर्धेतील तिन्ही सामन्यांमध्ये भारताने पाकिस्तानला लोळवले होते.

अनेक अडथळ्यानंतर या सामन्याचा मार्ग मोकळा झाला आहे, पण कोलंबोत पावसाची शक्यता आहे. पावसामुळे सामना रद्द झाला, तर भारत आणि पाकिस्तान दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात येईल.

## दारूच्या नशेत दहशत निर्माण करणाऱ्याला उरणमध्ये अटक

**उरण : वार्ताहर**

उरण शहर परिसरात शुक्रवारी (दि. १३) रात्री दारूच्या नशेत कोयता हातात घेऊन दहशत निर्माण करणारा एक तरुण आमदार महेश बालदी यांच्या राहत्या घराच्या कंम्पाऊंडमध्ये घुसला. त्याला पोलिसांनी अटक केली आहे. विशाल जयसिंग पवार (वय २५, रा. कामठा, उरण) असे या विकृत तरुणाचे नाव आहे.


दारू प्यायलेला विशाल पवार हातात कोयता घेऊन उरण-नागाव रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करीत असल्याचे दिसून आले. त्या वेळी स्थानिक लोकांनी त्यास अटकाव करण्याचा प्रयत्न केला असता तो रहिवासी बिल्डींगमध्ये स्वतःचा जीव वाचविण्यासाठी गेला. तेथील नागरिकांनीदेखील त्याला पकडण्याचा प्रयत्न केला.



त्या वेळी घाबरलेला विशाल हा आमदार महेश बालदी यांच्या घराच्या कंम्पाउंडमध्ये घुसला.

या संदर्भात माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन त्या तरुणाला ताब्यात घेतले. नशेत त्याने हे कृत्य केले असून याबाबत उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस यंत्रणा करीत आहे.

## पनवेलमध्ये शिवजयंतीनिमित्त भाजपतर्फे मराठा वेशभूषा स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष प्रभाग क्रमांक १९च्या वतीने येत्या गुरुवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणुकीनिमित्त पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने मिरवणूक काढण्यात येणार आहे. या वेळी होणारी मराठा वेशभूषा स्पर्धा १५ वर्षांखालील मुला-मुलींसाठी असून स्पर्धेला शहरातील गावदेवी मंदिरापासून सकाळी ७.३० वाजता सुरुवात होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १७ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करता येणार असून अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी चिन्मय समेळ (८७६७१४९२०३) किंवा देवांशू प्रभाळे (८४३३५१३५४०) यांच्याशी संपर्क साधावा आणि या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन स्पर्धा प्रमुख प्रशांत शेट्ये यांनी केले आहे.

## ज्येष्ठ पत्रकार धनंजय गोंधळी यांचे निधन

**उरण : प्रतिनिधी**



उरण तालुक्यातील चिरनेर येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय चिंतामण गोंधळी यांचे शनिवारी (दि.१४) वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह ग्रामस्थ व नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

धनंजय गोंधळी यांनी ग्रामीण पत्रकार म्हणून आपल्या लेखनाला अनेक वर्षांपूर्वी सुरुवात केली होती. त्यांनी स्वतःचे उरण टाइम्स हे साप्ताहिकही चालवले. नंतर ते दै. रामप्रहरसाठी कार्यरत होते. बातम्यांसह कथा, कविता, लेख असे अनेक प्रकारचे लेखन त्यांनी केले.

चिरनेर येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या सेकंडरी स्कूलचे चेअरमन म्हणून धनंजय गोंधळी यांनी निस्वार्थीपणे काम पाहिले. त्याचप्रमाणे जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची शिल्पचित्रे उभी करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्तपरिवार आहे.

## पनवेल म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनतर्फे महापौर आणि उपमहापौर यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे नवे महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी (दि. १३) म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक हॉल येथे करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिकेतील कायम तसेच कंत्राटी कामगार, कर्मचारी आणि अधिकारीवर्गाच्या विविध प्रश्नांवर म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन सातत्याने काम करत आहे. या युनियनतर्फे महापौर, उपमहापौरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात युनियनच्या सन २०२६च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले.



कार्यक्रमास नगरसेवक प्रकाश बिनेदार, अजय बहिरा, सुमित झुंजारराव, युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, सरचिटणीस अनिल जाधव, कार्याध्यक्ष संतोष पवार, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, महेंद्र गायकवाड, शैलेश गायकवाड, संजय जाधव यांच्यासह युनियनचे इतर पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, पनवेल महानगरपालिकेतील सर्व विभागांमधील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या गेल्या सात-आठ वर्षांपासून निदर्शनास आणून दिल्या गेल्या आहेत. त्या सर्व प्रश्नांची मला जाणीव असून कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यासह इतर मान्यवरांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

# पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार -मुख्यमंत्री



**बीड : प्रतिनिधी**

आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

परळीतील अंबेजोगाई रस्त्यालगत ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभागातर्फे आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठम कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, खासगी सचिव मंदार वैद्य, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त, बहुसंख्येने पशुपालक उपस्थित होते.

**शेतीला 'क्लायमेट रिस्क'मधून वाचवणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' असा दर्जा दिला आहे.

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धे पासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

### गावातला तरुण होईल पशुधन उद्योजक -मंत्री पंकजा मुंडे

*पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' आणत आहोत. महिलांना लखपतीदिदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे. तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मंत्री मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.*

## लाच घेताना वाशी शिक्षण मंडळाचा सहाय्यक अधीक्षक एसीबीच्या जाळ्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

अध्ययन अक्षमता असलेल्या एका विद्यार्थ्यास दहावीच्या परिक्षेसाठी लेखनिक (रायटर) उपलब्ध करून देण्यासाठी ८ हजार रुपयांची लाच स्विकारताना नवी मुंबईतील वाशी शिक्षण मंडळाच्या सहाय्यक अधीक्षकाला नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे वाशी शिक्षण मंडळात खळबळ उडाली.

सुदाम लोटन चव्हाण (५७) असे याप्रकरणी अटक केलेल्या अधिकाऱ्याचे नाव असून ते महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय कार्यालय, वाशी येथे सहाय्यक अधीक्षक व शाखा अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

तक्रारदार जिनियस लर्निंग सेंटर' येथील खाजगी शिक्षक आहेत. त्यांच्या लर्निंग सेंटरमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्यास अध्ययन अक्षमता असल्यामुळे फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी त्यास लेखनिक मिळावा तसेच विषय बदल करून द्यावेत, यासाठी मंडळ कार्यालयात अर्ज करण्यात आला होता. याबाबत विद्यार्थ्यांच्या आईने अधिकृत अधिकारपत्र देऊन तक्रारदारास कामकाज करण्याची जबाबदारी दिली होती. अर्ज प्रक्रियेदरम्यान २०० रुपयांचा दंड भरण्याची सूचना देण्यात आली, मात्र त्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने लेखनिक मंजूर करून देणे व विषय बदल करण्यासाठी दहा हजार रूपये द्यावे लागतील अशी लाचेची मागणी केली होती.

तडजोडीअंती ८ हजार रुपये स्विकारण्याचे मान्य करण्यात आले होते. त्यानुसार एसीबीने गुरुवार दि. १३ रोजी कार्यालयात सापळा हे रचला असता, संबंधितांकडून ८ हजार रूपयांची लाच घेतांना रंगेहात पकडले.



**पनवेल : येथील महापालिकेच्या महापौरपदी नितीन जयराम पाटील यांची निवड झाल्यानंतर विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रसिद्ध व्यावसायिक जयेश मेहता, दीपक मिराणी, गणेश भगत, कल्पेश ठक्कर, सोशल मीडिया हेड तथा कास्टिंग डायरेक्टर प्रसाद हनुमंते आणि रिफ्लेक्शन थिएटरचे व्यवस्थापक मृण्मय काणे यांनी महापौरांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.**

# कार्लई मतदासंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांवर कारवाई करा : ॲड. महेश मोहिते

## ॲड. मनस्वी मोहिते यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार, उच्च न्यायालयात याचिका दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणूकीत रायगड जिल्हा परिषदेच्या मुरूड तालुक्यातील ३७- कोर्लई मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पर्यवेक्षक यानी मतमोजणीत पक्षपातीपणा केला. त्यांनी केलेल्या गैर व्यवहाराबद्दल त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्याना त्यांच्या पदावरून निलंबित करावे. नवीन अधिकार्याचीं नेमणूक करून फेरमतमोजणी करावी अशी मागणी भाजपाच्या उमेदवार ॲड. मनस्वी मोहिते यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे. याबाबत उच्च न्यायलयात देखील याचिका दाखल करण्यात आली आहे, अशी माहिती भाजपाचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी दिली.

शनिवारी (दि. १४) अलिबाग येथील भाजपा कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ॲड. महेश मोहिते यांनी ही माहिती दिली. यावेळी कोलई मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार ॲड. मनस्वी मोहिते देखील उपस्थित होत्या.



निवडणूकीच्या मतमोजणच्या वेळी एकूण ३९ मतपेट्यांची पाच राऊंड मध्ये मत मोजणी करण्यात आली. मतमोजणी करत असताना ई. व्ही. एम् मशीनमधून आलेली आकडेवारी नोंदविण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना, नियम याची जाणीवपूर्वक पायमल्ली करून पक्षपाती मतमोजणी व्हावी या करिता ३७ कोर्लई जिल्हा परिषद गटाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित ई.व्ही.एम् मशीननुसार नियुक्त पर्यवेक्षक यांनी शिवसेनेच्या उमेदवार ज्योती नागावकर यांना विजयी करण्याचा हेतू मनात धरून ई.व्ही.एम् च्या आकडेवारीमध्ये फेरबदल केल्याचे दिसून आले आहे, असे ॲड. मनस्वी मोहिते यांनी निवडणूक आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना, नियम २९ नमुना व्ही . एम. – ४ या नमुन्यामध्ये ई. व्ही. एम् मशीनमध्ये नोंदविली गेलेली एकूण मते नमुद करून त्या मतांची विभागणी निवडणूकीच्या उमेदवारांना पडलेलया मतानुसार केली जाते. सदर व्ही. एम. – ४ हा नमुना फॉर्म भरून झाल्यावर त्यावरील आकडेवारीचा मेळ जुळतो आहे. याची खात्री ई.व्ही.एम् मशीन चे पर्यवेक्षक करतात व त्यानंतर त्याची खात्री उमेदवाराचे प्रतिनिधी यांचे कडून करून मतमोजणी प्रतिनिधिंच्या देखील त्यावर स्वाक्षर्या घेतल्या जातात व शेवटी हे व्ही. एम . – ४ फॉर्म निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सहीने अंतिम होतात. ३७ कोर्लई या गटात एकूण झालेल्या ३९ ई. व्ही. एम् मशीन च्या कोणत्याही व्ही. एम. –४ फॉर्म वरती पर्यवेक्षकानंतर मतमोजणी प्रतिनिधीच्या स्वाक्षरी घेऊन खात्री केलेली नाही. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक बाबतीत दिलेल्या मार्गदर्शक सूचनाव नियमांचा भंग झाला आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाणीव पूर्वक व्ही. एम. – ४ – २९ मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात बदल करून मतमोजणी प्रतिनिधींना मतदान यंत्रावरील उपलब्ध आकडेवारीत फेरबदल करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उमेदवारांची एकत्रित आकडेवारी व्ही . एम. – ४ च्या फॉर्मवर बेकायदेशीरपणे विहित नमुन्यात छेडछाड करून नव्याने तयार केलेल्या फॉर्ममध्ये भरण्यात आली व मतमोजणी प्रतिनिधिंच्या सहया मात्र अन्य ठिकाणी रकान्यामध्ये घेण्यात आल्या यामुळे ही बाब रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल ॲक्ट मधील कलम १३४ प्रमाणे गुन्हेगारी सदृश्य आहे. या बाबीचा विचार करता निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे.

वरील बाबी पाहता मतमोजणी प्रक्रिया ही अत्यंत संशयास्पद, पक्षपाती व ज्योती नागावकर या शिवसेनेच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठीच आ. महेंद्र दळवी यांच्या दबावात पार पाडल्याचे दिसून येते. मुख्य निवडणूक अधिकारी रायगड यांच्याकडे मी याबाबत स्वतंत्र अर्ज दिला आहे परंतु राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना, नियम यांच्या सपशेल भंग निवडणूक निर्णय अधिकारी ३७ कोर्लई, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्रावर नियुक्त पर्यवेक्षक यांनी केला असून अशा परिस्थितीत या सर्व अधिकार्यांचे निलंबन करून त्यांना कठोर शासन व्हावे रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल ॲक्ट कलम १३४ प्रमाणे त्यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा व या अधिकार्यां व्यतिरिक्त इतर अधिकार्यांची नियुक्ती करून रायगड जिल्हि परिषद ३७ कोर्लई या जिल्हा परिषद गटाचे फेरमतमोजणी व्हावी असे ॲड. मनस्वी महेश मोहिते यांनी अपल्या निवेदनात म्हटले आहे.

## संभाजी ब्रिगेडमार्फत 'गुड टच, बॅड टच' जनजागृती कार्यक्रम

**माणगाव : बातमीदार**

महाड शहरातील पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड आणि रायगड जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजी ब्रिगेड जिल्हा रायगड अंतर्गत महिला व बालकल्याण समिती यांच्या पुढाकारातून तसेच दामिनी पथक महाराष्ट्र पोलीस यांच्या विशेष सहकार्याने 'गुड टच – बॅड टच' जनजागृती कार्यक्रम



मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, वयाची सोळा वर्षे ही धोक्याची नसून शौर्याची असतात, त्यासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली होती, असा दैदिप्यमान इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे महिलांविषयक आदर्श धोरण स्पष्ट करताना कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा सन्मानपूर्वक परतावा याचा दाखला दिला. याचधर्तीवर महापुरुषांचे महिलाविषयक विचार स्पष्ट करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या अधिकारांसाठी आणि सन्मानासाठी हिंदू कोड बिल सादर करून तो संमत करून घेण्यासाठी प्रसंगी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला, याचीही आठवण करून दिली.

या जनजागृती कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्या राऊत , संभाजी ब्रिगेडचे रायगड जिल्हाध्यक्ष वैभव सुर्वे, महिला आघाडी रायगड जिल्हा संघटिका हर्षदा सुतार, महाड तालुकाध्यक्ष कैलास अटक, महाड शहर पोलीस कॉन्स्टेबल निकिता सुतार, महाड तालुका उपाध्यक्ष सुजित सुतार,तालुका संघटक सुनील सुतार, महाड तालुका उपाध्यक्ष तथा महिला आघाडी व बालकल्याण समिती अध्यक्ष वैष्णवी देशमुख, प्रियंका आंब्रे, मनीषा सुतार, खुशी सुतार, हर्षा सुतार, अपर्णा आंब्रे, प्रियंका सुतार आणि अरुणा सुतार उपस्थित होत्या.

## डोणवत येथे महिलेचा विनयभंग; शेजाऱ्यावर गुन्हा दाखल

**खोपोली : बातमीदार**

प्रेमाचा आठवड्यात त्रेपन्न वर्षीय इसमाने एकट्या महिलेला अश्लील हातवारे करून मला घरात घे असे म्हणत लज्जास्पद वर्तन केल्याची घटना वडवळ धवली पो.डोणवत ता.खालापुर येथे घडली आहे.

पीडित ३१ वर्षीय महिला हि आरोपी सुभाष बाबू चाळके वय ५३ रा. वडवळ येथे गावात राहत असून दिनांक १२ रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पिडीत महिला घरासमोर अंगणात एकटी उभी असताना घराच्या शेजारी राहणारा सुभाष चाळके . पिडितेला तुझ्या घरात कोणीही नाही मी येवु का घरात ,असे बोलुन अश्लिल हातवारे केले . त्यानंतर घाबरून पिडीता या घरात येवुन दरवाजा बंद करुन बसले असताना सुभाष यांने घराचा दरवाजा मोठमोठयाने ठोठावुन दरवाजा उघडा मला आतमध्ये यायचे आहे असे बोलुन मनात लज्जा निर्माण करुन तिचा विनयभंग केला.

**दुखवटा**

### विजय तटकरी




**पनवेल :** दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांचे जावई उद्योजक तुषार तटकरी यांचे वडील विजय धोंडू तटकरी यांचे शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुबईतील जे. जे. रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे व आप्तेष्ट असा परिवार आहे.

### जनार्दन पाटील



**मोहोपाडा:** भोकरपाडा येथील कै.जनार्दन दुंद्या पाटील यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.जगदगुरु रामानंदाचार्य नरेंद्रमहाराजांच्या प्रेरणेने कुटूंबियांनी कै.जनार्दन पाटील यांचे लक्ष्मी आय बॅक येथे नेत्रदान केले.त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र उध्दर रामेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी भोकरपाडा येथील राहत्या घरी होणार आहेत.

### डॉ. राजेंद्र धात्रक



**नागोठणे :** रोहा पंचायत समितीचे माजी सदस्य नागोठणे गावचे प्रसिद्ध डॉक्टर राजेंद्र बाबुराव धात्रक यांचे शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये वयाच्या ५८ व्या वर्षी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी रिचा, मुलगी, मुलगा, जावई नातू, सून, बंधू व बहीण असा मोठा परिवार आहे.

## घारापुरी बेटावर महाशिवरात्रीच्या निमित्ताने आज बम बम भोलेचा गजर

**उरण : प्रतिनिधी**

भारतात विविध बारा ज्योर्तिर्लिंगे प्रसिध्द आहेत. घारापुरी बेटावरही पुरातनकालीन चैतन्यमय आणि सजीव भासणारी शिवलिंगे अस्तित्वात आहेत. महाशिवरात्री निमित्ताने बेटावरील शिवलिंगाच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने देशी-विदेशी पर्यटक आणि शिवभक्त येतात.

देशभरातील सोमनाथ, मल्लिकार्जुन, महांकाळेश्वर, अमलेश्वर, वैजनाथ, रामेश्वर, नागेश, काशिविश्वेवर, त्र्यंबेकेश्वर, केदारेश्वर, घृणेश्वर अशी बारा ज्योर्तिलिंगे ठिकठिकाणी अवतीर्ण झाली आहेत. शाश्वत म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या या अद्भुत ज्योर्तिलिगांचे दर्शन घेण्यासाठी देशभरातुनच नव्हे तर अगदी जगभरातुनही दरवर्षी शिवभक्त येतात. बम बम भोलेचा जयघोष करीत शिवाच्या चरणी भक्तीभावाने नतमस्तक होतात.मुंबईपासुन ११ किमी अंतरावर असलेले घारापुरी बेट सहाव्या शतकातील प्राचीन शिवकालीन लेण्यांमुळे कायम जागतिक प्रसिध्दीच्या झोतात राहिले आहे.

बेटावर जाण्या-येण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया, जेएनपीए,उरण-मोरा,न्हावा बंदरातून होड्या, लॉचेस, मचव्यांची सोय असते. एकेरी ६५ रुपये तिकीटात बंदर विभागाने ही सोय केली आहे.

## शिवस्वरूप कराड याच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक



**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबईमधील नेरुळच्या मिनाताई ठाकरे हॉस्पिटलमध्ये उलवे येथील श्रीमती बयवबाई अरुण ठाकुर (बामणडोंगरी) यांची शुक्रवार (दि. १३) रोजी दिड तोळ्याची सोन्याची चैन हरवली होती. तेथेच दवाखान्यात आलेल्या कु.शिवस्वरूप भागिनाथ कराड रा.जुईनगर (वय वर्षे १०) या शाळकरी मुलाला सापडली. शिवस्वरूपच्या आईवडिलांनी ती चैन लगेचच नेरुळ पोलिस स्टेशन येथे जमा केली होती.

आज नेरुळ पोलिसांच्या सहकार्याने श्रीमती बयवबाई अरुण ठाकुर यांना त्यांची चैन परत मिळाली. आज शिवस्वरूप कराडचा नेरुळ पोलिस स्टेशन येथे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजय कांबळे आणि श्रीमती.बयवबाई ठाकुर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवस्वरूपच्या प्रामाणिकपणाचे व त्याच्या आई वडिलांनी दिलेल्या चांगल्या संस्कारा बद्दल आई वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रवासी महिलेवर चाकूने प्राणघातक हल्ला

## ऑटो रिक्षाचालकास ४८ तासांत अटक

पनवेल : वार्ताहर

प्रवासी महिलेवर चाकुने प्राणघातक हल्ला करुन तिला लुटणाऱ्या ऑटो रिक्षा चालकास ४८ तासाच्या आत अटक करुन जबरी चोरीस गेला. मुद्देमाल आणि रिक्षा जप्त करण्यात पनवेल शहर पोलिसांनी यश आले आहे.

संगीता सोमनाथ भोईर, रा. पनवेल या ऑटो रिक्षाने राहते घरी जात असताना करंजाडे आर/०४ मधील सत्य ट्रायंडट बिल्डींगच्या बाजुला असलेल्या सर्विस रोडवर आल्यानंतर रिक्षा चालकाने पिडीत महिलेस रिक्षा बंद पडली आहे असे सांगुन रिक्षा थांबवुन पिडीत महिलेच्या गळयावर, छातीवर व पायावर धारदार चाकुने वार करुन पिडीतास गंभीर जखमी केले व जबरदस्तीने पिडीताकडील सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याची चैन, मोबाईल फोन व रोख रक्कम हिसकावुन घेवुन पिडीतेस रस्त्यावर सोडून पळुन गेला होता.

या घटनेची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल



होताच गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांचे पर्यवेक्षणाखाली चार पोलीस पथके तयार करुन तपास सुरु करण्यात आला. त्याच प्रमाणे पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखे कडून समांतर तपास सुरु करण्यात आला. सदर पथकांनी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा फुटेजची तपासणी, तांत्रिक तपास, साक्षीदारांकडे तपास केला. तपासा दरम्यान एक प्रत्यक्षदर्शी साक्षीदार निष्पन्न करुन तपास केला. ऑटो रिक्षाचा क्रमांकाचे शेवटचे चार आकडेबाबत माहिती मिळाली. चार अंकाचा क्रमांक असलेल्या ऑटो रिक्षाचा शोध सुरु करण्यात आला.

संशयीत ऑटो रिक्षा चालकांकडे विचारपुस करण्यात आली. त्यावरुन ऑटो रिक्षाचा रिक्षा चालक अक्षय एकनाथ बागडे, वय २७ वर्षे, रा. करंजाडे, या रिक्षा चालकाने सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.सदर रिक्षा चालकाने त्याने घेतलेल्या कर्जाची परत फेड करण्यासाठी पैसे मिळविण्याच्या उद्देशाने नमुद गुन्हा केल्याचे प्राथमिक तपासा दरम्यान सांगितले आहे. गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपीने पिडीत महीलेकडून चोरलेले सोन्याचे मंगळसुत्र व गुन्हयात वापरलेली ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास वपोनि नितीन ठाकरे, पनवेल शहर पोलीस स्टेशन करीत असुन सदरची कारवाई भाऊसाहेब ढोले, सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशा) अभिजीत अभंग आणि सपोनि कृष्णा धामापुरकर, सपोनि प्रविण फडतरे, सपोनि राजेंद्र घेवडेकर, पोउपनि विनोद लभडे, पोउपनि हजरतअली पठाण, पोहवा अविनाश गंथडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, संदेश म्हात्रे, अमोल पाटील, पोना संजय सावंत, सम्राट डाकी, मिथून भोसले, पोशि शशिकांत काकडे, नितीन कांबळे, विशाल दुधे, सचिन कोर व किरण कराड यांनी केली आहे.

# पनवेल पोलिसांची अवैधरित्या गावठी दारू निर्मितीच्या हातभट्टीवर कारवाई

पनवेल : वार्ताहर



पनवेल शहर पोलिसांनी अवैधरित्या गावठी दारु निर्मितीच्या हातभट्टीवर धडक कारवाई करून १६ बॅरल अंदाजे ३००० लीटर गावठी दारु जप्त केली आहे.

पनवेल शहर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कुंडेवहाळ येथील कोरीपासून पुढे सुमारे ३ किलोमीटर अंतरावर डोंगराच्या टोकावरील जंगल परिसरात अवैधरित्या गावठी दारू निर्मितीची हातभट्टी सुरू असल्याची गोपनीय माहिती पनवेल शहर पोलिसांना प्राप्त झाली होती.

सदर माहितीच्या आधारे तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी कारवाई पथक तयार करून नमूद ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये १६ बॅरल मधील अंदाजे ३००० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली असून ती जागीच नष्ट करून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही हस्तगत करण्यात आले आहे.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर कारवाई दारूबंदी अधिनियम कलम ६५ (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आली असून वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा अमोल पाटील, संदेश म्हात्रे, मिथुन भोसले, विशाल दुधे, सचिन कोर, किरण कराड आदींच्या पथकाने केली आहे.



**पनवेल : भाजप राज्य परिषद समिती सदस्य अरुणशेठ भगत यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील महायुतीच्या विजयाबद्दल शुभेच्छा देताना सुरेश खानावकर, विशाल खानावकर, विनोद खानावकर, आनंद सोनावणे, राजेश पाटील, शंकर घोगरे, राजू सावंत, आनंद काबले, गोपीनाथ महाराज, राम म्हात्रे, दिलीप खानावकर, शत्रुघ्न खानावकर, रामबुवा खुटारकर, राम खानावकर, पंढरीनाथ खानावकर आदी.**

# पनवेल आरटीओमध्ये दुचाकींसाठी नवीन मालिका

## आकर्षक क्रमांकांसाठी १७ फेब्रुवारीला अर्ज स्वीकारणार



अलिबाग : रामप्रहर वृत्त

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी MH46DG ही नवीन नोंदणी मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक विहित शुल्क भरून घेऊ इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांच्याकडून करण्यात आले आहे.

अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत डिमांड ड्राफ्ट (DD), निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रती खाजगी वाहन विभागात जमा कराव्यात.एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी दि. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.०० वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अर्जदारांनी दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २.३० वाजेपूर्वी इच्छित जास्तीच्या रकमेचा डीडी बंद लिफाफ्यात जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (नवीन वाहन नोंदणी विभाग) यांच्या दालनात लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे.

अर्जदारांना सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे :- डिमांड ड्राफ्ट "RTO PANVEL’ यांच्या नावे नॅशनलाइज्ड किंवा शेड्युल्ड बँकेचा असावा व तो दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा. अर्जासोबत पॅनकार्ड, ई-आधारकार्ड व पत्त्याचा पुरावा साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी सिलबंद पाकिटात सादर करावा. विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचा किंवा दोन महिन्यांपेक्षा जुना डीडी स्वीकारला जाणार नाही. एकदा राखीव ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. राखीव दिनांकापासून १८० दिवसांत वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेली फी शासन जमा होईल. आकर्षक क्रमांकासाठी भरलेली फी कोणत्याही परिस्थितीत परत अथवा समायोजित केली जाणार नाही. चालू मालिका पूर्ण झाल्यानंतरच नवीन मालिका सुरू होणार असून, आगाऊ स्वीकारलेल्या अर्जांच्या पावत्या जुन्या मालिकेतील क्रमांक संपल्यानंतरच जारी केल्या जातील.

# पनवेल रेल्वे स्टेशन नवीन ब्रिजवरून पडून इसमाचा मृत्यू

पनवेल : वार्ताहर

पनवेल रेल्वे स्टेशन येथील नवीन बुकिंग ब्रिजवरून पडून एका अंदाजे ३५ वर्षीय अज्ञात इसमाचा मृत्यू झाल्याची घटना रात्रीच्या सुमारास घडली. या घटनेची नोंद पनवेल लोहमार्ग पोलिस ठाण्यात करण्यात आली असून मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिस मृताच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

सदरचा हा इसम पनवेल रेल्व स्थानक नवीन ब्रिजवरून पडल्याने जबर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत पोलिसांना मिळून आला होता. पोलिसांनी त्यास उपचारसाठी उप जिल्हा रुग्णालय पनवेल येथे दाखल केले असता, तेथील ऑन ड्युटी डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. अंगाने मध्यम बांधा असलेल्या या मृत इसमाची उंची ५ फुट ५ इंच इतकी असून त्याने अंगात पिवळ्या रंगाचा हाफ बाह्यांचा टी शर्ट त्याचे आत हिरव्या रंगाचे बनियन, व नेसणीस निळ्या रंगाची फुल जीन्स पॅन्ट परिधान केली आहे. मृताच्या डाव्या हाताच्या मनगटावर सुधीर व चार स्टारचे ओळख चिन्ह गोंदलेले आहे.



**पनवेल : भाजप राज्य परिषद समिती सदस्य अरुणशेठ भगत यांना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील महायुतीच्या विजयाबद्दल शुभेच्छा देताना भाजपा युवा मोर्चा तालुका चिटणीस भरत फराड, ज्येष्ठ नेते सुरेशशेठ खानावकर, युवा नेते विनोद खानावकर.**

# सीकेटी विद्यालयात कब-बुलबुल शिबिर



पनवेल : रामप्रहर वृत्त

चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालयात शुक्रवार (दि. १३) रोजी एक दिवसीय कब-बुलबुल शिबिराचे आयोजन केले. या शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापक सुभाष मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिरात सहकार्य, स्वावलंबन, धाडसी वृत्ती, आज्ञाधारक वृत्ती हे गुण विद्यार्थ्यांमध्ये दिसून आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना प्राथमिक उपचाराविषयी माहिती दिली. तसेच खेळ, गप्पागोष्टी, गीत, नृत्य असे मनोरंजनाचे कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली. विविध स्पर्धा घेण्यात आल्या, प्राविण्य प्राप्त करणाऱ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके देण्यात आली.




**पनवेल : कुंडेवहाळ येथे शिवमंदिरात वर्धापन दिनानिमित्त दर्शन घेताना भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत.**

# पाताळगंगा नदीकिनारी वसलेले गुळसुंदे येथील प्राचीन सिद्धेश्वर मंदिर

मोहोपाडा : प्रतिनिधी

पाताळगंगा नदीकाठावरील गुळसुंदे हे गाव खूप प्राचीन गाव आहे. औद्योगिकीकरण व त्यापाठोपाठ आलेल्या शहरीकरणाच्या रेट्यातही या खुणा जपून ठेवल्या गेल्या आहेत. गुळसुंदे ते आसपासच्या परिसरात जी मंदिरे आहेत त्यातील जागृत असे सिध्देश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर पेशव्यांचे सुभेदार रामजी महादेव बिवलकर यांनी बांधले. मंदिर जुन्या पध्दतीचे दगडी बांधकामाचे मजबूत असे आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. देशमरातून भाविक येथे महाशिवरात्रीला दर्शनासाठी येतात.



मंदिराबाजूला एक शिलालेख असून यावरील महादेवसूत बाजी करमरकर यांनी सिध्देश्वराच्या पायाशी अर्पण केले, असा मजकूर सहज बाचता येण्यासारखा आहे. मंदिरामागे विश्रामधाम आहे. शिलालेखातील अक्षरे व कोरीव कामाची शैली पाहिली तर ती अडीचशे वर्षाहून अधिक जुनी असल्याचे दिसून येते. गुळसुंदे येथील हे श्री सिध्देश्वराचे मंदिर पाताळगंगा नदीच्या तीरावर असून प्राचीन शिल्पकलेचा एक सुंदर असा अविष्काराच आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर अतिशय सुंदर असे नक्षीकाम केलेले आहे. त्यामुळे हे प्रवेशब्दार लक्ष वेधून घेते. प्रवेशव्दारासमोर



दीपमाळ आहे. मुख्य मंडपात प्रवेश केल्यावर पाषाणाचा नंदी दृष्टीस पडतो. येथील सभामंडपाचे नक्षीकाम अतिशय सुबक दिसते तसेच बाजूच्या भिंतीवरही कोरीव काम केलेले आहे. गाभा-याच्या दाराजवळ विष्णू मुर्ती आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात रेखीव अशी शंकराची पिंडी व पिंडीवर घंटा व कलश बांधलेला आहे. कलशामधून सतत थेंब थेंब पाणी पडत असते.

या पिंडीमागे आणखी एक लहान आकाराची पिंडी असून ती स्वयंभू आहे. मंदिराच्या बाह्य भिंतीवरील नक्षीकाम अतिशय देखण व नजरेत भरण्यासारखे आहे. कमळाच्या पाकळ्यांनी अतिशय सुंदर अशी नक्षी त्या कळसावर काढलेली आहे. अशा या प्राचीन व देखण्या वास्तूचे मुसळधार पावसापासून रक्षण व्हावे म्हणून या मंदिराच्या कळसावर व सभामंडपावर सिमेंट पत्र्याचे छत तयार करण्यात आले आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरत असून राज्यातील विविध ठिकाणाहन भाविक भक्त दर्शनाला येतात. प्राचीन सिध्देश्वराचे मंदिर आपटा रेल्वे स्थानकापासून एक किमी, तर रसायनी रेल्वेस्थानकापासून दोन किमी अंतरावर आहे.

# एमएनएम विद्यालयात आंतरशालेय स्पर्धा उत्साहात

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालयात संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी पदार्पण वर्षानिमित्त गौरव गाथा शीर्षकांतर्गत पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागासाठी काव्यवाचन, घोषवाक्य, कथाकथन कोलाज तयार करणे या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कर्तृत्व, सामाजिक कार्य तसेच त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धेमध्ये संस्थेच्या संलग्न शाळा पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेचे बक्षीस वितरण वैभव घरत यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

स्पर्धेतील विद्यार्थ्यांना संबोधित करताना या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या अंगभुत कला गुण, अभिव्यक्ती, सादरीकरण यांना प्रोत्साहन मिळत असून विद्यार्थ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा आलेख दर्शवणारे कोलाज स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

स्पर्धेचे परीक्षण सिद्धार्थ लोखंडे, रतिका ठाकूर, रत्नमाला पाटील व भास्कर म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन माने, दिपाली कोल्हे यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख शर्मिन काझी, वंदना जाधव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



URGENTLY REQUIRED

SENIOR SITE ENGINEER (CIVIL) ...... 3 NOS.
Qualification: B.Tech/BE Civil
Exp: Min 8 to 10 years into Site Execution (Civil)

QA/QC MANAGER (CIVIL) ...... 1 NOS.
Qualification: B.Tech/BE Civil
Exp: Min 8 to 10 years into Quality Control

SENIOR ARCHITECT .... 2 NOS.
(1 FOR CIVIL & 1 FOR LIASONING)
Qualification: B.Arch
Exp: Min 8 to 10 years into Architecture (Civil)

STRUCTURAL ENGINEER 1 NOS.
Qualification: B.E/B.Tech (Civil)
Exp: Min 6 to 10 years into Structural Engineering

ESTIMATION & BILLING ENGINEER 1 NOS.
Qualification: B.E/B.Tech
Exp: Min 4 to 8 years into Estimation & Billing

SENIOR SURVEYOR ..... 2 NOS
Qualification: Diploma / BE or B.Tech
Exp: Min 5 to 10 years as Land Surveyor

CHARTERED ACCOUNTANT 2 NOS.
Qualification: CA Qualified
Exp: Min 4 to 6 years as Chartered Accountant

FINANCE MANAGER...... 3 NOS.
Qualification: MBA Finance
Exp: Min 8 to 10 years into Finance Domain

MANAGER (LAND ACQUISITION REAL ESTATE)...... 3 NOS.
Qualification: Graduate
Exp: Min 8 to 10 years into Land Acquisition Role
Language Expertise - Marathi

AUDIT SENIOR SITE ENGINEER 1 NOS.
Qualification: B.E/B.Tech (Civil)
Exp: Min 4 to 6 into Site Execution Audit

QA/QC MANAGER (AUDIT)...... 1 NOS.
Qualification: B.Tech/BE Civil
Exp: Min 4 to 6 years into Quality Control

HR MANAGER (FEMALE).. 1 NOS.
Qualification: MBA
Exp: Min 8 to 10 years into HR
(Generalist Role & Labour Law Compliance Must)

ADMIN MANAGER.... 1 NOS.
Qualification: MBA
Exp: Min 8 to 10 years into Admin Profile

IT EXECUTIVE 1 NOS.
Qualification: B.SC IT OR BCA
Exp: Min 2 to 4 years into (IT Hardware, Software, Networking)

WALK-IN-INTERVIEW
DATE- 21st Feb 2026 & 22nd Feb 2026 | Time-10.00AM to 06.00PM
QA/QC Manager, Senior Site Engineer & Land Surveyor Manager job location will be Khalapur, rest all above positions job location will be Panvel
Age Criteria for all above positions (35 to 40 years)

INTERVIEW VENUE DETAILS
RIYASAT INFRA DEVELOPERS PVT LTD
Add: Reliance Center Point Building, 2nd Floor, Palaspe Phata
Panvel, Navi Mumbai - 410221
Contact-8097057906/8655765946 | Email - hr.mumbai@riyasatinfra.com

# फिल्मी गॉसिप्सची चव गेली, अळणी वाटू लागलंय....

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

शर्मिला टागोरने शैलीदार फलंदाज आणि चपळ क्षेत्ररक्षक मन्सूर अली खान पतौडीची विकेट कशी काढली आणि त्याच्याशी लग्न करून त्याची बेगम कशी झाली या विषयी एका रसिक पिढीला काय भारी उत्सुकता होती हो...

सिलसिला पिक्चरमध्ये दिग्दर्शक यश चोप्रा अमिताभ बच्चन आणि रेखा यांच्यातील जवळीकीत जया बच्चन यांची होत असलेली घालमेल म्हणा, चिडचिड म्हणा दाखवत आहेत असे या चित्रपटाचे स्वित्झर्लंडमध्ये चित्रीकरण सुरू व्हायच्या आतच खमंग रुचकर चर्चा...

आपलं निस्सीम प्रेम व्यक्त करण्यासाठी सलमान खान अख्खी रात्र ऐश्वर्या रॉयच्या प्रशस्त इमारतीबाहेर होता ही गोष्टही गाजली...

चित्रपटाच्या जगातील गॉसिप्स एक महत्त्वाचा फंडा. राज कपूर आणि नर्गिस यांच्यापासून गॉसिप्सच्या रंगात अनेक जोड्या गाजल्या. विवाहित पुरुष आणि अविवाहित अभिनेत्री यांच्या खरोखरच्या अथवा खोट्या नात्याविषयीचे समाजातील जवळपास सर्वच स्तरातून असलेलं कुतूहल कायमच सुपर डुपर हिट. धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांच्या हळूहळू विणल्या गेलेल्या नातेसंबंधावर वेबसिरीज बनेल. त्या काळात यांच्या जवळकीवर गॉसिप्स मॅगझिनमधून इतकं आणि असं काही रंगवून खूलवून वाढवून शिजवून सांगितलं गेलं की त्यातून धर्मेंद्रचाच भडका उडाला. अशा गरमागरम स्टोरीजची जणू शोध पत्रकारिता करण्यात माहिर असलेल्या देवयानी चौबळ आणि त्या जोडीला कृष्णा यांच्या दिशेने एकदा धर्मेंद्र धावून गेल्याची गोष्ट एका मराठी वृत्तपत्रात पहिल्या पानावरची बातमी ठरली. बंगालच्या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुंबईत निघालेली कलाकारांची मदत फेरी महालक्ष्मी येथील टर्फ क्लबवर संपत असतानाच हा ड्रामा घडला. या क्षणी लालबुंद झालेल्या धर्मेंद्रने एक प्रकारे हेमा मालिनी यांच्याशी असलेल्या नात्याची अप्रत्यक्षपणे कबुलीच दिल्याचे मानले जाते.

गॉसिप्स मॅगझिनमधून विनोद खन्ना आणि अमृता सिंग यांच्यापासून संजय दत्त आणि माधुरी दीक्षित यांच्यातील कळत नकळत बंध निर्माण झालेला असो (त्यात तो विवाहित, मात्र सुभाष घई सांगत, यांच्यात तसं काही नाही.) अशा अनेक सेलिब्रिटींच्या जवळीक असो, मग दुरावा असो, विनोद मेहरा आणि बिंदीया गोस्वामी यांचा घटस्फोट असो, आशा सचदेव म्हणा शीतल म्हणा अथवा पद्मिनी कपिला, के.टी. मिर्झा, कोमिला विर्क, किम, किमी काटकर, प्रेमा नारायण अशा अनेक अभिनेत्रींची ( त्यांना त्या काळात पिन अप गर्ल म्हणत) धाडसी फोटो सेशन, बेधडक मुलाखती हे सगळे त्या गॉसिप्स मॅगझिनचा खुराक असे. सत्तर आणि ऐंशीच्या दशकात या नावाच्या अभिनेत्री होत्या हे आजच्या ग्लोबल युगातील जेन झी पिढीला कदाचित माहित नसावे आणि ते माहित असूनही काही उपयोग नाही इतक्या आणि अशा सहजतेने आज इन्स्टाग्रामवर आजच्या पिढीतील अनेक मॉडेल्स बिकीनी गर्ल म्हणून दर्शन घडवताहेत.









साधारण तीस वर्षांपूर्वी रंगीला गर्ल साकारताना उर्मिला मातोंडकरने तनहा तनहा यहा पे जीना यह कोई गाण्यात पडदाभरचे प्रसंगानुरूपचे ग्लॅमरस दर्शन पाहून काहींनी लगेचच टीकेचा सूर लावला. आजही तुम्ही यू ट्यूबवर हे धक धक गाणे पहा, ते कुठेही अश्लील वाटत नाही, अतिशय देखणे आणि आकर्षक असेच दिसते. तशी नजर हवी, दृष्टिकोन हवा. तो नसेल तर उलटसुलट चर्चा होत राहते.

आज वेबसिरीजमध्ये मॉडर्न वस्त्रातील अभिनेत्री, बेदिग सूट अथवा बिकीनी बेबीज, मोकळेढाकळे प्रणय दृश्य याचे काही आश्चर्य वाटत नाही. तशी दृश्ये देण्यासाठीची व्यावसायिकता आणि मानसिक ताकद आजच्या पिढीतील कलाकारांमध्ये आहे. साऊथचे चित्रपट भडक असतात असे म्हटले जाते. तेथील तेलुगू अथवा तमिळ चित्रपटात थीमची आणि प्रसंगानुरूप धाडसी प्रेम दृश्ये आपल्या महाराष्ट्रीयन अभिनेत्रीही देतात. गुगलवर सर्च केल्यावर साऊथच्या चित्रपटातील श्रृती मराठे असे बघा. सकारात्मक उत्तर मिळेल आणि त्यासाठी तिला दादच द्यायला हवी.

असं काही पूर्वी असते तर त्यावरुन गॉसिप्स शिजले असते. कधी काळी विश्वजीतने अंजाना सफर या





चित्रपटाच्या सेटवर रेखाचे चुंबन घेतले यावरील चर्चेचा फार फार किस पाडला गेला. आज धाडसी कथानकावरील चित्रपटात तो सहज येतो जातो. सई ताम्हणकरचे हंटर (२०१५) या चित्रपटातील प्रणय दृश्य फार गाजले. तसं दृश्य देण्यासाठी लागणारी हिंमत तिच्यात दिसली हे महत्त्वाचं. मग अशा दृश्याच्या चित्रीकरणात चलाखी किती, कॅमेरा ट्रीक कशी हे वेगळे समीकरण आहे. आता व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करून त्यात काय काय दाखवता येईल हे पडद्यावर पहावे.

गॉसिप्स मॅगझिनचा सर्वात मोठा खुराक सेलिब्रिटीचे लग्न, मग त्यांच्या संसारातील धुसफूस. राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया यांचे अगदी अनपेक्षित लग्न झाले आणि ती मराठी वृत्तपत्रातातील पहिल्या पानावरची बातमी झाली आणि दोन मुली झाल्यावर त्यांच्या पालनपोषणात हे दाम्पत्य रमले असतानाच त्यांच्यात वाद विवाद निर्माण झालेत अशा अनेक गोष्टी वांद्रे येथील कार्टर रोडवरील आशीर्वाद बंगल्याबाहेर पडू लागल्या. यावर गॉसिप्स मॅगझिनमधून काय काय आले काही विचारू नका. जणू जगात अन्य कोणाच्या संसारात काही भांडणेच होत नाहीत, पण त्यांना ग्लॅमर नाही हा मोठाच वांदा आहे.

आजच्या मनोरंजन क्षेत्रातील सुज्ञ सेलिब्रिटी अतिशय थाटामाटात लग्न करतात, सोशल मीडियात भरभरून कव्हरेज मिळवतात. एखाद्या सेलिब्रिटीच्या साखरपुड्याच्या कव्हरेजचे हक्क आपणास मिळावेत म्हणून काही डिजिटल चॅनेल चांगली किंमत द्यायला तयार असतात अशी कुजबुज आहे. लग्नाचे प्रक्षेपण विकणे आहे (साखरपुडा मोफत) या नावाचा चित्रपट निर्माण होऊ शकतो आणि म्हटले तर एक चांगला व्यवहार आहे. काही सेलिब्रिटी आपण लग्न करतोय अशी स्वतः पोस्ट शेअर करतात, तर काही सेलिब्रिटी त्याहीपेक्षा अधिक वेगाने आम्ही वेगळे होत आहोत अशी पोस्ट करतात. बरं अशी पोस्ट कोणाची आणि कधी वाचायला मिळेल हे अजिबात सांगता येत नाही अशी आज जणू प्रगती झाली आहे. अशा धक्कादायक (खरंच का?) बातम्या आतापर्यंत गॉसिप्स मॅगझिनमधून येत आणि तेथून त्या भाषिक माध्यमातून आल्या तरी त्यांना फार महत्त्वाचे स्थान नसे. विनोद खन्नाने दुसरें लग्न केले तेव्हा अनेकांना समजले की त्याने पहिल्या लग्नाचा घटस्फोट घेतला आहे. आपल्या घटस्फोटाचे अवाजवी प्रदर्शन केले जात नसे.

चित्रपटसृष्टीतील घटस्फोटाचीही आपली एक परंपरा आहे, काही दाम्पत्ये एकमेकांपासून वेगळी राहिली (म्हणूनच सुखात राहिली की काय? उदाहरणार्थ देव आनंद आणि कल्पना कार्तिक. देव आनंद भलेही रूपेरी पडद्यावरील मदन असेल अथवा प्रणयाचे प्रतिबिंब असेल, पण खासगी आयुष्यात पत्नीपासून वेगळा राहिला). आजच्या अनेक सेलिब्रिटीजना आपलं काम, आपली अभिनय शैली आणि क्षमता यापेक्षा आपल्या खासगी गोष्टींची आपणच प्रसार माध्यमातून भरभरून मुलाखती देत चर्चा व्हावी असे वाटते की काय? जे गॉसिप्स मॅगझिनमधून येत असे, ते आज खुद्द सेलिब्रिटीज सांगताहेत तर मग आपण कशाला, फिल्मी पार्टी कल्चर असो, सेलिब्रिटीजचे विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंध असो, कोणाचे असलेच तर दुसरं लग्न असो, असेलच तर दुसरं तिसरं लफडे असो, आपण त्याच्या शोधात असण्यापेक्षा त्या गोष्टी कोणीही न विचारता समोर येत आहेत. त्यामुळे त्यातला जोर का धक्का धिरेसे लगे हा पंच गेला. आमिर खान जाहीरपणे बोलून आपलं दुसरं लग्न करतो हे सौम्य ठरले. त्यातील मानसिक, भावनिक गरजा ही महत्त्वाची गोष्ट.

फिल्मी गॉसिप्समध्ये असलेला आश्चर्याचा धक्काच हरवलाय. दिग्दर्शक आदित्य चोप्रा आणि राणी मुखर्जी यांचे प्रेमप्रकरण आश्चर्यकारक होते. तो विवाहित, तर ती अभिषेक बच्चनची पत्नी होणार अशी हवेतील बातमी, अशातच करिश्मा कपूर बच्चन खानदानाची सून होणार हे चक्क जाहीर झाले. पहिल्या रिळातच हा खेळ संपला. आणि ऐश्वर्या राय बच्चन खानदानाची सून झाली. अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्यातही काही बिनसल्याची बराच काळ अशीच चर्चा होत राहिली.

गॉसिप्सचा हा प्रवास अनेक वळणे घेत घेत चालला, यात रंजकता होती. अनपेक्षित धक्का होता. हे सगळे करण जोहरच्या चकाचक मल्टी स्टार कास्ट चित्रपटासाठी मसाला देणारे आहे.

आज मनोरंजन क्षेत्राचा फार फार विस्तार झाला आहे, रिल स्टार ही नवीन जमात आता काही सेकंदात इन्स्टाग्रामवर दिसते आणि गायब होते. वेब सिरीजमध्ये अनेक धाडसी दृश्ये असतात. यातून काही गॉसिप्स गंमत जन्माला येईल असे समजू. आपण आशावादी वर्गाचे प्रतिनिधित्व करतोय आणि गॉसिप्स म्हणा, कुचाळक्या करणं म्हणा, कोणाला आवडत नाही? ते सर्वांनाच पचनी पडते. आजच्या मनोरंजन क्षेत्रातील मोकळ्या वातावरणातून जे जे बाहेर पडतेय ते धक्कादायक नसले तरी चर्चेसाठी खाद्य नक्कीच आहे... फिल्मी गॉसिप्सची चव गेल्यासारखे वाटतेय, ते अळणी वाटू लागले असले तरी फार उपासमार होणार नाही याची खात्री असू देत. कोणत्या अभिनेत्रीसाठी कोणता अभिनेता आपल्या लाडक्या बायकोला सोडचिठ्ठी द्यायला तयार होईल हे सांगता येत नाही हीच तर या गॉसिप्सची गंमत जंमत आहे... काय सांगावे? माझा पहिल्या नवरा आणि त्याची दुसरी बायको अथवा एका लग्नाचा अनुभव असलेली बायको अशा नावाच्या मालिका अथवा वेब सिरीज निर्माण होतील. मेरा पती सिर्फ मेरा है या नावाचा जितेंद्र आणि रेखाची भूमिका असलेला एक चित्रपट आला होता. माझ्या नवऱ्याची बायको या नावाची मालिकाही लोकप्रिय झाली. रसिका सुनील याच मालिकेने स्टार झाली.

एका नवीन युगातील मनोरंजन क्षेत्रात आपण आज कार्यरत आहोत, त्यात जणू लाईव्ह गॉसिप्स आहे. पूर्वी निदान एखादं गॉसिप वरवरचं असे, आता सबकुछ खुल्लम खुल्ला मामला है. त्यातूनच काही गॉसिप्स जन्माला येईलच की... सिनेमाचे जग आहे म्हटल्यावर अफेअर, लफडी, विवाहबाह्य आकर्षण, पार्टीतील फंडा, मोकळं ढाकळ वागणे, वावरणे असे बरेच काही असतेच, असायलाच हवे....

# महाशिवरात्रीची व्रतकथा

एकदा पार्वतीने परमेश्वर शिवशंकरांना विचारले, असे कोणते श्रेष्ठ तसेच सरळ व्रत-पूजन आहे, ज्यामुळे मृत्यू-लोकातील प्राण्यांना तुमची कृपा प्राप्त होईल? उत्तरादाखल शंकराने पार्वतीला 'शिवरात्री'च्या व्रताची कथा सांगितली. एका गावात एक शिकारी राहत होता. मुक्या जनावरांची हत्या करून तो आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करीत असे. तो सावकाराचा कर्जदार होता. त्याने त्याचे कर्ज वेळेवर चुकविले नव्हते. त्यामुळे संतापून सावकाराने शिकारीला शिवमठात कैदी बनविले. योगायोगाने त्याच दिवशी शिवरात्र होती.

शिकारी ध्यानमग्न होऊन शिवा संबंधित धार्मिक गोष्टी ऐकत राहिला. चतुर्दशीला त्याने शिवरात्रीची कथाही ऐकली. सायंकाळी सावकाराने त्याला जवळ बोलावून कर्ज फेडण्याविषयी विचारले. शिकारी दुसऱ्या दिवशी सर्व कर्ज फेडेन असे वचन देऊन कैदेतून सुटला. आपल्या दिनचर्ये प्रमाणे तो जंगलात शिकारीसाठी निघाला, पण दिवसभर कैदेत राहिल्यामुळे तो तहान-भुकेने व्याकूळ झाला होता. शिकार करण्यासाठी तो तलावाकाठच्या बेलपत्राच्या झाडावर मचाण बांधू लागला. बेल-वृक्षाच्या खाली बेलपत्रांनी झाकले गेलेले शिवलिंग होते. शिकाऱ्याला मात्र हे माहीत नव्हते. मचाण बनविताना त्याने ज्या फांद्या तोडल्या त्या योगायोगाने शिवलिंगावर पडल्या. याप्रकारे दिवसभर उपाशी असलेल्या शिकार्याचे व्रतही झाले आणि त्याच्याकरवी शिवलिंगावर बेलपत्रही वाहिले गेले.

एका प्रहरानंतर एक गर्भिणी हरणी तलावावर पाणी पिण्यासाठी पोहचली. शिकार्याने आपल्या धनुष्याने तिच्यावर नेम साधलाच होता तितक्यात ती हरिणी बोलली, मी गर्भिणी आहे, तू एकाच वेळी दोन जीवांची हत्या करशील. हे योग्य नाही. मी आपल्या पिलाला जन्म देऊन लवकरच तुझ्यासमोर येईल. तेव्हा तू मला मार. शिकाऱ्याने धनुष्य बाजूला ठेवले आणि



हरिणी झाडांआड लुप्त झाली.

काही वेळाने दुसरी हरिणी तेथून निघाली. शिकाऱ्याच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्याने तिच्यावर नेम साधला. हे बघून त्या हरिणीने त्याला सांगितले, की हे पारधी! मी एक कामातूर विरहिणी आहे. आपल्या प्रियेच्या शोधात भटकत आहे. मी माझ्या पतीला भेटून लवकरच तुझ्याजवळ येईन.

शिकारीने तिलाही जाऊ दिले. दोनदा शिकार हातातून गेल्यामुळे तो चिंतित झाला. तेवढ्यात एक हरिणी आपल्या पिलासोबत तेथून निघाली. शिकाऱ्याला जणू सुवर्णसंधीच मिळाली. त्याने धनुष्याला बाण लावला आणि बाण सोडणार तेवढ्यात ती हरिणी बोलली, हे पारधी! मी माझ्या पिलाला त्याच्या वडिलांकडे सोडून लगेच येते, यावेळी तू मला मारू नकोस.

शिकारी हसला आणि म्हणाला समोर आलेली शिकार सोडून द्यायला मी काही मूर्ख नाही. याआधी मी दोनदा शिकार गमावली आहे. माझी मुले तहान-भुकेने व्याकूळ झाले असतील. उत्तरादाखल हरिणी म्हणाली, जशी तुला आपल्या मुलांची काळजी वाटते आहे तशीच मलाही वाटत आहे. त्यामुळे मी फक्त काही काळ तुझ्याकडून जीवनदान मागत आहे. माझ्यावर विश्वास ठेव. मी लगेच परत येईल.

हरिणीचा तो व्याकूळ स्वर ऐकून शिकाऱ्याला तिची दया आली. त्याने तिलाही जाऊ दिले. शिकार न मिळाल्यामुळे तो बेलाच्या झाडावर बसून बेलपत्र तोडत खाली फेकत होता. काही वेळाने एक धष्ट-पुष्ट मृग त्या रस्त्यावरून जात होता. आता या मृगाची नक्कीच शिकार करावी असा विचार केला, पण त्याच्यावर नेम धरला असता मृग दीनवाण्या स्वरात म्हणाला, हे पारधी! जर तू माझ्या आधी तीन हरिणींना मारले असेल तर मला मारण्यातही वेळ करू नकोस, म्हणजे त्यांच्या वियोगात मला एकही क्षणाचे दुःख सहन करावे लागणार नाही. मी त्यांचा पती आहे आणि जर तू त्यांना जीवनदान दिले असशील तर मला काही क्षणांसाठी जीवनदान देण्याची कृपा कर. मी त्यांना भेटून तुझ्यासमोर हजर होईल.

मृगाचे बोलणे ऐकून शिकाऱ्याच्या डोळ्यासमोरून संपूर्ण रात्रीचे घटना-चक्र आले. त्याने सर्व कथा मृगाला ऐकविली. तेव्हा मृगाने सांगितले, माझ्या तीनही पत्नी येथून वचनबद्ध होऊन गेल्या आहेत, मात्र त्या माझ्या मृत्यूनंतर आपल्या धर्माचे पालन करू शकणार नाहीत. त्यामुळे तू मला आता जाऊ दे, मी त्यांच्यासमवेत तुझ्यासमोर हजर होतो.

उपवास, रात्रीचे जागरण तसेच शिवलिंगावर बेलपत्र चढविल्यामुळे शिकारीच्या हिंसक हृदयाचे निर्मल हृदयात परिवर्तन झाले होते. धनुष्य त्याच्या हातातून निसटले. शिवाने त्याच्या हृदयात बदल घडवून आणला. त्याला आपल्या भूतकाळातील कर्मांचा पश्चात्ताप झाला. थोड्याच वेळात मृग सपरिवार शिकाऱ्यासमोर आला. या प्राण्यांमधील प्रेम पाहून शिकार्याच्या डोळ्यातून अश्रू वाहायला लागले. शिकार्याने त्यांना न मारता आपणही मुक्या प्राण्यांची हिंसा न करण्याचे ठरविले.

देवलोकातून समस्त देव ही घटना बघत होते. घटनेची परिणती झाल्याबरोबर देवी-देवतांनी फुलांचा वर्षाव केला. तेव्हा शिकारी तसेच मृग परिवाराला मोक्षप्राप्ती मिळाली. **(साभार : वेबदुनिया)**


# कवी, लेखक, कादंबरीकार नामदेव ढसाळ

नामदेव लक्ष्मण ढसाळ हे कवी, लेखक, कादंबरीकार आणि नाटककार अशा विविध पैलूंनी प्रसिद्ध असणारे दलित चळवळीमधले ज्येष्ठ नेते. मुंबईतल्या अत्यंत गरीब आणि बकाल भागात बालपण घालवल्याने त्यांनी दारिद्र्य आणि ससेहोलपट जवळून पाहिली आणि आपल्या विशिष्ट भाषेतून त्यांनी ते दलितांचे आयुष्य शब्दबद्ध केले. आजच्याच तारखेला (१५ फेब्रुवारी) १९४९ रोजी त्यांचा जन्म झाला होता.

नामदेव ढसाळ यांचा जन्म पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यातील कनेरसरशेजारच्या पूर या खेड्यात झाला. त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने लहानपणीच ते वडिलांसोबत मुंबईला आले. मुंबईतील गोलपीठा या वेश्यावस्ती असलेल्या भागातील झोपडपट्ट्यांमध्ये त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील खाटीक होते. नामदेव ढसाळांनी मुंबईमध्ये अनेक वर्षे टॅक्सी चालवली. ढसाळांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर मोठा प्रभाव होता. त्यांनी काव्य, गद्य, वृत्तपत्रांतील स्तंभलेखन यातून आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार मांडले. त्यांच्या क्रांतिकारी साहित्याची दखल जागतिक पातळीवरही घेतली गेली.

१९७३मध्ये नामदेव ढसाळ यांचा पहिला कवितासंग्रह गोलपिठा प्रकाशित झाला. मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले हा माओवादी विचारांवर आधारित, तर प्रियदर्शिनी हा त्यांचा इंदिरा गांधी यांच्या विषयीचा कविता संग्रह आहे तसेच खेळ हा शृंगारिक कवितांचा संग्रह आहे.

ढसाळ यांनी साहित्याच्या माध्यमातून दलितांच्या व्यथा, वेदनांना प्रसिद्धी दिली. महाराष्ट्र आणि भारताला प्रभावित करणाऱ्या दलित पँथर या आक्रमक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. या संस्थेची स्थापना त्यांनी १९७२मध्ये दलित चळवळीतील समवयस्क सहकाऱ्यांच्या व साहित्यिकांसह केली. या संघटनेवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर चळवळीचा प्रभाव होता. या संघटनेद्वारा ढसाळ यांनी दलितांच्या अनेक प्रश्नांवर उग्र आंदोलने केली व तत्कालीन सरकारांना



दलित हिताच्या भूमिका घेण्यास भाग पाडले. कालांतराने या चळवळीत फूट पडल्यावरही ढसाळ हे दलित पँथरमध्येच राहिले. मराठवाडा विद्यापीठ नाम विस्तारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दलित चळवळीला त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

नामदेव ढसाळ हे १९६०नंतरच्या मराठी कवींमधील प्रमुख कवी समजले जातात. त्यांनी विशिष्ट शैलीने मराठी कवितेत मोलाची भर घातली. त्यांनी भाषिकदृष्ट्या प्रमाण मराठी भाषेपेक्षा वेगळी भाषा वापरली. त्यांच्या लिखाणावर लघुनियतकालिकांचा, मनोहर ओक यांचा तर काही प्रमाणात दिलीप चित्र्यांचा प्रभाव दिसतो. त्यांच्या कृतींमध्ये वेदना, विद्रोह व नकार हा स्थायीभाव आहे.

नामदेव ढसाळ आयुष्याची शेवटची अनेक वर्षे मायस्थेनिया ग्रॅव्हीज या दुर्धर आजाराने ग्रस्त होते. याशिवाय त्यांना कॅन्सरचा आजारही जडला होता. १३ जानेवारी २०१४ रोजी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. १५ जानेवारीला पहाटे चारच्या सुमारास त्यांचे निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते.

नामदेव ढसाळांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती तेवत ठेवण्याच्या इराद्याने वैभव छाया आणि इतर समविचारी मित्रांनी नामदेव ढसाळ स्मृती गौरव समितीची स्थापना करून एकूण आयुष्याला सलाम करणारा सारे काही समष्टीसाठी अभिवादनपर कार्यक्रम दरवर्षी १५ जानेवारी रोजी मुंबई येथे साजरा केला जातो. (साभार : इंटरनेट)

# कुष्ठरुग्णांची सेवा करणारे पहिले भारतीय मनोहर दिवाण

भारतात कुष्ठरोग सेवेचा पाया घालणारे व दत्तपूर येथे पहिला कुष्ठरोग आश्रम स्थापन करणारे गांधीवादी विचारवंत मनोहर दिवाण यांचे आज पुण्यस्मरण. मनोहर दिवाण यांचा जन्म विदर्भातील बुलढाणा या गावी २० नोव्हेंबर १९०१ रोजी झाला. एक हुशार विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात. ते मुंबईच्या जे जे स्कूलमधून ड्रॉइंगच्या तीन परीक्षा उत्तीर्ण झाले होते.

वर्ष १९१९मध्ये ते मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथमश्रेणीत प्रथम येऊन उत्तीर्ण झाले. नंतर त्यांनी नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला. त्यापूर्वी हायस्कूलमध्ये इंटरच्या वर्गात असताना त्यांनी १९२१मध्ये महात्मा गांधींच्या आवाहनानुसार कॉलेज सोडले व खामगाव येथे टिळक राष्ट्रीय विद्यालय या संस्थेची स्थापना करण्यात पंधेगुरुजी व इतरांसोबत सहभागी झाले. मनोहर दिवाणांना महात्मा दिवाण या नावाने महात्मा गांधी स्वत: संबोधित असत. दिवाणांची तसेच त्यांच्या कार्याची नव्या पिढीला फारसा परिचय नाही. ते विठ्ठल भक्त होते. तरुणपणी मनोहरजींनी खामगाव ते पंढरपूर अनेकदा पायी वारी केली होती.

सुरुवातीस गांधीजींच्या कार्यक्रमात कुष्ठरोगी सेवेचा समावेश नव्हता, मात्र मनोहरजींनी विनोबांची परवानगी मिळविली व डॉ. जगन्नाथ महोदय यांच्या सहयोगाने कुष्ठरोगी सेवाकार्य सुरू केले. यासाठी त्यांनी स्वतः रायपूरजवळील मिशनऱ्यांच्या संस्थेत त्यांनी उपचाराचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी जेव्हा संस्था उघडण्याचे ठरविले, तेव्हा ते कोलकत्ता येथील स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसीन



या संस्थेत प्रशिक्षणासाठी पोहोचले. तेथे फक्त डॉक्टरांना प्रवेश मिळत असे, परंतु मिशनरी लोकांच्या शिफारशीमुळे मनोहरजींना प्रवेश मिळाला.

वर्ष १९३६मध्ये त्यांनी महारोगी सेवा मंडळाची स्थापना केली व कुष्ठरोग्यांच्या सेवेला वाहून घेतले. दत्तपूर येथे त्यांनी कुष्ठधाम स्थापन केले व स्वतः आईसोबत तेथे राहू लागले. गांधीजींच्या आश्रमात असताना दिवाण डोंगरावरच्या दत्तमंदिरात गेले होते. त्यांना तेथे एक विकलांग कुष्ठरोगी दिसला. मनोहरजींनी त्याला पाठीवर घेऊन बारा मैल प्रवास केला होता. त्यास दत्तपूर आश्रमात भरती केले. वर्ष १९४२मध्ये भारत छोडो आंदोलनात त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. त्यांना तुरूंगवास झाला.

तुरुंगातून सुटून आल्यावर त्यांनी पुन्हा महारोगी सेवा सुरू केली. त्यांनी खऱ्या अर्थाने दीनदुबळ्यांसाठी केलेल्या समाजसेवेचे प्रतीक म्हणून भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर केलर. मात्र, मनोहरजींनी नम्रपणे हा पुरस्कार नाकारला. शेवटी विनोबाजींनी गळ घातली तुमच्यासाठी नाही, या रुग्णांसाठी पद्मश्री स्वीकारा. विनोबाजींचा शब्द प्रमाण मानून मनोहरजींनी पद्मश्री पुरस्कार स्वीकारला. त्यांनी कुष्ठरोगापासून वेदापर्यंत अशा अनेक विषयांवर मराठीत आणि हिंदीत अनेक ग्रंथ लिहिले.

वर्धा येथे त्यांना एका सायकलरिक्षाने ठोकरले व त्यात ते जखमी झाले. त्यांना दवाखान्यात दाखल केले, परंतु त्यातच १५ फेब्रुवारी १९८० रोजी त्यांचे निधन झाले. मनोहरजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुष्ठधामाचे नाव मनोहर आरोग्य निकेतन असे ठेवण्यात आले. **-माधव विद्वांस**

# महाड नगर परिषदेची पाईपलाईन ठेकेदाराने फोडली; लाखो लिटर पाणी वाया

**महाड : प्रतिनिधी**

महाड-रायगड मार्गाचे काम करणाऱ्या अक्षय कन्स्ट्रक्शन या कंपनीचे मुंबई-गोवा महामार्गा लगत खरंच करंजखोल गावच्या हद्दीत नाते खिंड या ठिकाणी रस्ता रुंदीकरणासाठी डोंगर खुदाईचे काम सुरू असताना, रस्त्यालगत असणारी महाड नगरपालिकेची जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले असून, आता ऐन उन्हाळ्यामध्ये महाड शहराला पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे.



महाड रायगड या महामार्गाचे काम गेली पाच वर्ष संथ गतीने सुरू आहे. या महामार्गाच्या अखेरच्या टप्प्यामध्ये मुंबई गोवा महामार्गा लगत, करंजखोल या गावाच्या हद्दीत नातेखिंड या ठिकाणी असणारे ही खिंड फोडून या ठिकाणी रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र रुंदीकरणाच्या अगोदर या ठिकाणी असणारी महाड नगरपालिकेची कोथर्डे येथून येणारी जलवाहिनी हटविणे गरजेचे होते. ६०० मीटर व्यासाची लोखंडी जलवाहिनी या ठिकाणी असताना देखील अक्षय कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराने महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सुचने नुसार या ठिकाणी खुदाईचा कामाला सुरूवात केली व या खुदाई दरम्यान मोठमोठे दगड या जलवाहिनी वर पडल्याने जलवाहिनीचा एअर वॉल फुटून लाखो लिटर पाणी वाहून वाया गेले आहे.

सदर जलवाहिनी या ठिकाणावरून हटविण्यासाठी महामार्ग विभागाने वेळोवेळी महाड नगरपालिकेला पत्रव्यवहार केला होता असे महामार्ग विभागाचे म्हणने आहे. मात्र महाड नगरपालिकेने उदासीनता दाखवीत सदर जलवाहिनी या ठिकाणावरून हटविता येणार नाही. तर या पाईपलाईनला सिमेंट जॅकेटींग करून सुरक्षित केली जाईल असे महाड नगर पालिकेकडून कडून सांगण्यात आले होते. मात्र गेले कित्येक महिने या ठिकाणी पाईपलाईनला जॅकेटिंग न झाल्याने रुंदीकरणाचे काम रखडले होते. याप्रकरणी महामार्ग विभागाच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता अक्षरा डहाके जगताप यांना याप्रकरणी विचारणा केली असता, नगरपालिकेने सदर पाईपलाईनची जॅकेटींग केल्यामुळे या ठिकाणी खुदाईच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे या जलवाहिनी चा नादुरुस्ताची पूर्ण जबाबदारी ही आता नगरपालिकेची आहे. महामार्ग विभाग व नगरपालिका यांच्या या वादात महाड शहरातील नागरिक भीषण पाणीटंचाईला सामोरे जातील यात शंका नाही.

**संबंधित ठेकेदार हा निष्काळजीपणा काम करीत असून पोकलेन मशीनच्या बकेटचा धक्का लागल्याने पाईपलाईनचा एअर व्होल तुटला, मात्र आता या एअर व्होलला लोखंडी जॅकेट केले जाणार आहे व त्यानंतरच खोदाईच्या कामाला सुरुवात होणार आहे तसेच खिंडीमध्ये उत्तेरेकडून खोदाईच्या सूचना ठेकेदाराला केल्या आहेत. त्यामुळे या पुढे अशा प्रकारे पाईपलाईन फुटणार नाही.**

**-रोहित भोईर अभियंता पाणीपुरवठा, महाड नपा**

## उन्हाळी भातशेती लावणी सुरू
## मजूर मिळणे कठीण, तरीही हंगाम जोरात



**चौक : प्रतिनिधी**

उन्हाळी भात शेती लावणी सुरू असून मजूर मिळणे कठीण झाले आहे, तरीही काहीच दिवसात लावणीची कामे पूर्ण होतील, असा विश्वास शेतकरी यांनी व्यक्त केला.

कर्जत तालुक्यातील टाटा पॉवर स्टेशन भिवपुरी यांच्या वीज उत्पादन पाण्यावर ही भात शेती आणि काही प्रमाणात भाजीचे पिक घेतले जाते. कर्जत तालुक्यात भिवपुरी येथे टाटा पॉवर स्टेशन आहे. वीज उत्पादन नंतर हे नाल्याद्वारे परिसरातील सुमारे २९ गावातील ३५२.१ हेक्टर जमिनीवर भात पिकाची लागवड केली जाते,तर साधारण ११ गावातील शेतकरी भात पिका बरोबर भाजीपाल्याचे पीक घेतात, साधारण १६.३ हेक्टर जमिनीवर भाजीपाला पिक घेतले जाते,

यात आंबोट,लाडीवली व कडाव या गावांचा समावेश आहे.उन्हाळी भात शेती हे भरवशाचे पिक आहे. साधारण शेतकरी आधुनिक झाल्याचे दिसून येत असून ट्रॅक्टर द्वारे भात लावणी करताना दिसत आहेत. मात्र मजूर मिळणे कठीण झाले आहे. बारमाही पाणी असल्याने अनेक शेतकरी यांनी फार्म हाऊस बनवले आहेत. हा परिसर निसर्गरम्य असून पावसात येथे अनेक पर्यटक आकर्षिले जातात, उन्हाळ्यात मुबलक पाणी, मुंबई पुणे याच्या मध्यावर हा परिसर असून मुंबई पुणे बरोबर ठाणे, नवी मुंबई येथील पर्यटक आणि निसर्ग प्रेमी मोठ्या प्रमाणात येत असल्याने फार्म हाऊस नेहमी गजबजलेले असतात.अनेक मजूर फार्म हाऊस वर काम करतात, तर काहीजण बांधकाम ठिकाणी जात आहेत.तरीही शेतकरी आपल्या कुटुंबातील सदस्य यांच्या सोबत शेती करतात. उन्हाळी भात शेती साठी सिंचनाची सोय आहे. अधिक उत्पादन देणारी शेती आहे.

# ग्रामीण भागातील शिक्षणाला ‘पोस्को’ची बहुमोल साथ : १८ शाळांचा कायापालट

**माणगाव : प्रतिनिधी**

केवळ औद्योगिक प्रगती म्हणजे विकास नव्हे, तर समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची ज्योत पोहोचवणे हीच खरी प्रगती, हा विचार प्रत्यक्षात उतरवत पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने माणगांव तालुक्यात सामाजिक बांधीलकीचा नवा आदर्श घालून दिला आहे. कंपनीच्या सीएसार उपक्रमांतर्गत माणगांव तालुक्यातील रा.जि.प. शाळा उतेखोल आदिवासीवाडी आणि रा.जि.प. शाळा चव्हाणवाडी मिळून १६ जिल्हा परिषद शाळांचे नूतनीकरण व २ शाळांचे संपूर्ण बांधकाम (एकूण १८ शाळा) आणि सुविधांचे उन्नतीकरण यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे



दुर्गम भागातील अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना आता सुरक्षित, स्वच्छ आणि प्रेरणादायी वातावरणात शिक्षण घेता येणार आहे.

या प्रकल्पांतर्गत नूतनीकरण करण्यात आलेल्या दोन शाळांचा लोकार्पण सोहळा गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडला. यावेळी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे संचालक वॉन क्यू हान यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आपल्या भाषणात त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, शिक्षण हीच उज्वल भविष्याची खरी गुरुकिल्ली आहे. मुलांसाठी एक सुरक्षित आणि उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. हा प्रकल्प केवळ आमचा नसून ग्रामस्थ, शाळा प्रशासन आणि आमच्या सीएसार टीमच्या एकत्रित परिश्रमाचे फळ आहे.

पोस्को महाराष्ट्र स्टील केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता, माणगांव तालुक्यातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असल्याचेही हान यांनी स्पष्ट केले. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि उपजीविका या चार प्रमुख स्तंभांवर कंपनी आपले सामाजिक कार्य यापुढेही असेच सुरू ठेवणार आहे. विद्यार्थ्यांनी या सोयी-सुविधांचा पूर्ण लाभ घ्यावा, मोठी स्वप्ने पाहावीत आणि जिद्दीने अभ्यास करावा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. या सोहळ्याला वरिष्ठ अधिकारी राजू गडुते आणि सी. एस. आर. टीम, तसेच शिक्षक, ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दिव्यांग कल्याण आयुक्त सत्यजित बडे यांचा सत्कार

**अलिबाग: प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) झेप घेतली आहे. त्यांची नुकतीच पुणे येथे महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानिमित्त शुक्रवारी (दि.१३) त्यांचा रायगड जिल्हा परिषदेतर्फे सत्कार करुन त्यांना निरोपही देण्यात आला.



सन २००२मध्ये महाराष्ट्र विकास सेवेत प्रवेश केलेल्या सत्यजित बडे यांनी गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ते अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रत्येक जबाबदारीत त्यांनी कामापेक्षा परिणामांवर भर दिला. सन २००२ ते २००७ या कालावधीत आंबेगाव आणि सांगली जिल्ह्यातील वाळवा पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी म्हणून त्यांनी विकासकामांना गती दिली. पुढे पुणे आणि सातारा जिल्हा परिषदांमध्ये सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी प्रशासकीय शिस्त आणि कार्यक्षमतेचा आदर्श ठेवला.

सन २०२३ पासून ते रायगड जिल्हा परिषद येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने त्यांचे काम विशेष लक्षवेधी ठरले आहे. या वेळी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, नवनियुक्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन जालिंदर पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग विशाल तनपुरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम, शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले, जिल्हा कृषि अधिकारी पवनकुमार नजन, यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# ’समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदैव तत्पर’




**अलिबाग: रामप्रहर वृत्त**

विधी सेवा समितीच्या माध्यमातून जिल्हा व तालुका स्तरावर विधी सेवा समितीकडून वेळोवेळी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येत असतात. विधी सेवा समितीकडून अनेक बाबतीत मोफत कायदेविषयक सेवा पुरविली जाते. विधी सेवा समितीच्या या कार्याची माहिती सर्वांना व्हावी तसेच सर्वांसाठी न्याय ही संकल्पना सर्वत्र पोहोचावी आणि समाजातील सर्व घटकांना तातडीने न्याय मिळावा,यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व जिल्हा विधी सेवा समितीचे अध्यक्ष राजेंद्र सावंत यांनी आरसीएफ हॉल कुरूळ येथील सभागृहात संपन्न झालेल्या विधी सेवा महशिबिर, शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्यात केले.

या शिबिरास जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, जिल्हा विधी सेवा समितीच्या सचिव तेजस्विनी निराळे, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अलिबाग बार असोसएशनचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, जिल्ह्यातील न्यायालयांतील न्यायाधिश, शासनाच्या विविध खात्याचे अधिकारी,जिल्हा व जिल्ह्यातील तालुका विधी सेवा समिती मधील वकील वर्ग, अनेक मान्यवर, शासकीय कर्मचारी तसेच बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत म्हणाले की, या महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि त्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे हे आहे. जिल्हा विधी प्राधिकरणामार्फत अनेक योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू जनतेला व्हावी तसेच तळागाळातील विविध समाजातील घटकांपर्यंत पोहचावी आणि कोणताही नागरिक न्यायापासून वंचित राहू नये याकरिता हा महामेळावा आयोजित करण्यात आहे. संविधानाने सर्वांना समान न्यायाची संधी दिली आहे. त्यामुळे हा उपक्रम महत्वाचा असून सर्व घटकातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी श्री.सावंत यांनी जिल्हा व तालुका स्तरावर विधी सेवा समितीकडून राबविले जाणारे विविध उपक्रम व सेवांची माहिती उपस्थितांना दिली.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर तीन वाहनांचा विचित्र अपघात



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर शुक्रवारी पहाटे एका उभ्या असलेल्या कारला टेम्पोने पाठीमागून जोरदार धडक दिली तर कारने समोरील कंटेनरला धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र भीषण अपघात झाला असून यात कोणीही जखमी झाले नाही मात्र कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

एक्सप्रेस वेवरून कंटेनर चालक भरूच कुमार यादव कंटेनर मुंबई हुन पुण्याकडे घेऊन जात असताना एक्सप्रेसवेवरील बोरघाटातील आडोशी बोगद्याजवळ आला असता टॅफिकमुळे तिसऱ्या लेनला उभा असताना स्विफ्ट कार चालक आदित्य सिंग गौतम याने आपली कार दुसऱ्या लेन मध्ये उभी केली असता पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने कारला पाठीमागून जोरदार धडक दिली तर कारने समोरील कंटेनरला जोरदार धडक दिल्याने तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. यात कोणीही जखमी झाले नसून कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.


## PUBLIC NOTICE

This is to informed public at large, that my client M/s Jaihind Projects Ltd Registred office address office No 908/A, Shapath V, Opp. Karnavati Club, S.G Highway, Ahmedabad-380015. Gujarat, INDIA intent to sale the following non agriculture properties to the interested purchaser.

**Schedule of the non agriculture properties**

**Village: Kumbhivli, Taluka: Khalapur, District: Raigad**

| Sr No. | Village | Gut no/ Hissa No | Area | Assessment |
|---|---|---|---|---|
| 1. | Kumbhavli | 2/5/B | 0-80-20 | Rs. 1203.00 |
| 2. | kumbhivali | 2/8 | 0-68-00 | Rs. 1020.00 |

| Sr No. | Village | Gut No/Hissa | Area No | Assessment |
|---|---|---|---|---|
| 1 | Virgaon | 10/1 | 0-53-20 | Rs. 798.00 |

Any person having any right, title, possession or interest in above mentioned non agricultural lands or having any objection or transfer for the sale above said non agricultural lands to my client please may contact the undersigned with relevant proper documents of above said non agricultural lands within 07 days the date of publication of this public Notice, failing which my client will proceed to complete the sale transaction with the non agricultural land owners of the by execution of sale deed and no subsequent objection or claim whatsoever shall be entertained.

**Place - Parwel**
**Date- 09/02/2026**

**sd/-**
**Adv. Deepak R. Shelke**
Address:D-3/1, Kinara Ho. So., Bavan Banglow,, Panvel, Panvel,, Dist. Raigad Mob. No. 9820795605

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे-मानघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली मिळकत, सदरहू मिळकतीचे गांव नमुना नं.७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्री. धरमशी हिरजी चौहान यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनींचे वर्णन**

**मौजे-मानघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गट/हिस्सा नं. | भूधारणा पध्दती | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८/२ | भोगवटादार वर्ग-१<br>पोट खराबा<br>एकूण | ०-१८-९०<br>०-०४-३०<br>०-२३-२० | ३=७२ |

सदरहू मिळकतीत वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, कूळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस, मा. दिवाणी न्यायालयाचे जैसे थे हुकूम अथवा मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर दिवाणी न्यायालयाने दाव्यात अंतिम न्याय-निर्णय अथवा हुकूमनामा पारित केलेला असल्यास, कोणत्याही महसूली न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अथवा महसूली न्यायालयाचे मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर अंतिम न्याय निर्णय पारित केलेले असल्यास अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचेकडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर करावयात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकती निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहेत आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहेत व आमच्या अशिलांचे लाभांतील प्रस्तावित खरेदीखतास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहित धरुन, आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण : - पनवेल
दिनांकः- १७/०२/२०२६.

**सही/-**
**श्री. जगदीश उरणकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट ऑफिसः- १०१, आदीत्यप्रज्ञा को. ऑप, हौ. सो., गोखले हॉल शेजारी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड.**

# पनवेल, कामोठे व नावडेमध्ये फुटपाथवरील अनधिकृत शेड, झोपड्यांवर तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रभाग समिती – क कामोठेमध्ये आज दिनांक १३ फेब्रुवारी रोजी कामोठ्यातील सेक्टर २१,व २२खांदा कॉलनी तसेच उपविभाग नावडे हद्दीतील तळोजे फेज – २ येथील अनधिकृत झोपड्या, रस्त्यावरील अतिक्रमण तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर चिकन विक्री शेड, फेरीवाले, अनधिकृत स्टॉल्स यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली. तसेच साहित्य जप्त करण्यात आले.

महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती 'क' कामोठ्यातील सेक्टर २१,२२ व खांदा कॉलनी येथील अनधिकृत झोपड्या, रस्ते तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर शेड, हातगाड्या,भाजीवाले, फेरीवाले, अनधिकृत नर्सरी यांच्यावरती अधिक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली अतिक्रमण विभागाच्यासाह्याने ही कारवाई केली.



याचबरोबर आज उपविभाग नावडे हद्दीतील तळोजे फेज – २ येथील बेकायदेशीर झोपड्या, रस्ते तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर चिकन विक्री शेड, फेरीवाले यांच्यावर अरविंद पाटील यांच्या देखरेखीखाली तोडक कारवाई करण्यात आली तसेच साहित्य जप्त करण्यात आले.

तसेच नवीन पनवेलमध्ये गुरुवारी रेल्वे स्टेशन परिसरातील रस्त्यावरील अनधिकृत स्टॉल्स, दुकानांवरती अतिक्रमण विभागाच्या साह्याने तोडक कारवाई करण्यात आली. याचबरोबर आज प्रभाग समिती ड मधील पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात अनधिकृत विक्रेत्यांवर व झोपड्यांवर कारवाई करण्यात आली.यावेळी सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर व प्रभारी अधिक्षक रोशन माळी उपस्थित होते.

# शाळकरी मुलांचा पायी प्रवास होतोय धोकादायक!

## रिस भटवाडीजवळ गतिरोधक नसल्याने अपघाताला आमंत्रण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड–रसायनी या मार्गावर भटवाडी रिस रस्त्यालगत तळाटी सजा कार्यालय, प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा, आरोग्य केंद्र बॅका, रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुकाने असून शाळेत जाताना शाळकरी मुले पायी चालत जाणे पसंद करीत असतात, मात्र मागील काही महिन्यापूर्वी या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्यामुळे पालकांच्या मनात आपल्या पाल्यांविषयी भीती निर्माण होत असून, मुलगा शाळेत पोहचेपर्यंत ते घरी येईपर्यंत पालक भीतीच्या छायेखाली असल्याचे मत पालक वर्ग करीत आहे.

या मार्गावरून पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे जाणा–या वाहनांची रहदारी सुरुच असते.यावेळी दांडमार्गे रिस मोहोपाडा दिशेने येणारी वाहने सुसाट चालवली जात असल्याने अपघातांना आमंत्रण मिळत आहे. भटवाडीजवळ उतार असल्याने वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी गतिरोधकाची आवश्यकता आहे.येथे गतिरोधक नसल्याने वाहने वेगात चालवली जात असल्याने लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

परिसरातील मुले शिक्षण घेण्यासाठी याच रस्त्यावरुन पायी जात असतात. परिणामी या रस्त्यावर अवजड वाहने मोठ्या प्रमाणात रेलचेल असल्यामुळे अपघाताची समस्या गंभीर होत आहे.

दरम्यान, भटवाडीजवळ गतीरोधक त्याच बरोबर वाहनांची गती कमी करण्याचे फलक लावण्याची मागणी पालक वर्गासह प्रवासी करत आहेत.या मार्गावर अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे,

मात्र आपला पाल्य शाळेत पोहचेपर्यंत तसेच घरी येईपर्यंत पालक चिंतेने ग्रासले जात असल्याचे पालक वर्गाचे म्हणणे आहे.तरी भटवाडी थांब्यासमोर सार्वजनिक बांधकाम विभागाने गतिरोधक न लावल्यास नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# सीकेटी विद्यालयात स्काऊट गाईड निसर्ग शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांग ू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शुक्रवारी (दि. १३) स्काऊट गाईड निसर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त समाजसेवा, स्वयंशिस्त, स्वावलंबन, श्रममूल्य व इतर मूल्यांची रुजवणूक करण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धन यासंबंधी वेगवेगळ्या उपक्रमांच`आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी झेंडागीत, प्रार्थना, नाटिका, स्फूर्तीगीत या कार्यक्रमांच` सादरीकरण केले.

या कार्यक्रमास लाभलेल्या प्रमुख अतिथी सौ. नीलिमा पाटील विज्ञान शिक्षिका न्यु इंग्लिश स्कूल मार्केट यार्ड तसेच इंग्रजी माध्यमिक विभागाच` मुख्याध्यापक संतोष चव्हाण ह्यांनी विद्यार्थाना मनोगत व्यक्त करताना म्हटले की. स्काऊट गाईड एकसंघ राहण्याची शिकवण देत असून समाजात आदर्शवत काम करीत आहे. असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यावेळी विद्यालयाच` प्राचार्य कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये विद्यालयाच` शिक्षक हरिश्चंद्र ठाकूर, ज्योती पाटील, विलास यशवंतराव, . सुबोध दिवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्या मावलीकर, स्वाती पाटील, . हेमा रापते, समिता पाटील,. अर्चना पाटील, शमिका मोरे, ज्योती बडवी यांनी निसर्ग शिबिरास भेट दिली. या उपक्रमाबद्दल विद्यालयाच` प्राचार्य कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्र, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमांतर्गत मनपा शाळांमध्ये विविध उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त भव्य हिंद–दी–चादरया ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी महापालिकेच्यावतीने महापालिकेच्या शाळांमध्ये विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि.१३) पनवेल महानगरपालिका शाळा क्र.५ मोठा खांदा व कोळेश्वर विद्या मंदिर शाळा क्र.४ येथे आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त, महेश कुमार मेघमाळे व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी ३५० व्या शहिदी समागम निमित्त शाळेत विविध कार्यक्रम घेण्यात आले.

यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना प्रार्थना ऐकवण्यात आली व शाळेत निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच गायन स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

# आर.एन. मित्तल यांची शोकसभा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळ यांच्या विद्यमाने अखिल भारतीय वरिष्ठ महासंघाचे माजी अध्यक्ष आर. एन. मित्तल यांच्या निधनानिमित्त सोमवारी ज्येष्ठ नागरिक भवन नेरूळ येथे दि. ना. चापके यांच्या अध्यक्षतेखाली शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी आईस्कॉम अध्यक्ष टी. टी. आर. उन्नी, फेस्कॉम अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब टेकाळे, जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष विकास साठे, माजी अध्यक्ष अरविंद वाळवेकर, आईस्कॉम, फेस्कॉम व ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळचे कार्यकारीणी सभासद व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी अतिरिक्त वित्त सचिव पी. आर. गुप्ता, डॉ. नामदेव डफळ, अजय माढेकर, विकास साठे डॉ. अंकुशराव जांभळ आदींनी श्रद्धांजली वाहिली.

# शेव्याचे स्वयंभू शिवमंदिर

**उरण : वार्ताहर**



उरण शहरापासून १४ किलो मीटर अंतरावर असलेल्या जेएनपीटी गेस्ट हाऊस समोर असलेले स्वयंभू साडेतीनशे वर्षा पूर्वीचे मंदिर आहे .शेव्याचा शंकर मंदिर हे प्रसिद्ध आहे . निसर्गाच्या सानिध्यात , गर्द झाडीत असलेले मंदिर खूपच सुंदर मंदिर आहे .महाशिवरात्री निमित्त उरण तालुक्यातून .शिव भक्त दर्शनासाठी येत असतात माझे वडील शिवराम वामन दर्णे हे पूर्वी पुजारी होते. आता मी संतोष दर्णे म्हणून पुजारी चे काम पाहत आहे..

मंदिरा जवळ गणपती ,पार्वती व हनुमान यांच्या मूर्ती पुरातन असून त्या हेमांडपंथी आहेत. त्याच प्रमाणे मंदिराच्या डाव्या बाजूस दत्त मंदिर ,उजव्या बाजूस वेताळ व शान्तेश्वरी मंदिर आहेत ,श्रावणी सोमवार , प्रत्येक सोमवारी व महाशिवरात्र दिवशी ५ ते ६ हजार भाविक दर्शनास येत असतात . दानशूर व्यक्तीन कडून महा प्रसादाचे अयोजान् करण्यात येत असते .

जेएनपीटी प्रशासनाने नवीन मंदिर बांधण्याचे काम हाती घेतले असून पुढील काळात ओगस्ट महिन्यात पूर्ण होईल त्या बद्दल तालुक्यातील सर्व शिवभक्त आभारी आहेत असे मंदिराचे पुजारी संतोष दर्णे यांनी सांगितले .रविवार ( दि. १५ ) रोजी महाशिवरात्र असल्याने सर्व भक्तांनी दर्शनाचा, लाभ घ्यावा असे मंदिराचे पुजारी संतोष दर्णे यांनी विनंती केली आहे.

# मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत '४७°C' लघुचित्रपट

## प्रदर्शन व उपाययोजना संवाद कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई क्लायमेट वीकचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका, प्रोजेक्ट मुंबई आणि एसआयईएस इन्स्टिटयूट, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने '४७°C' या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद कार्यक्रम संपन्न झाला.

लघुचित्रपटानंतर 'हवामान बदल आणि त्याचा सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम' या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित चर्चासत्र पार पडले. यामध्ये लेखक व चित्रपट दिग्दर्शक तेज सिसोदिया, सिविक स्टुडिओचे श्रेय जैन आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी वैचारिक सहभाग घेतला.

यावेळी वाढत्या तापमानाची तीव्रता, शहरी भागातील उष्णतेची समस्या, कचरा व्यवस्थापन, हरित उपक्रम आणि नागरिकांच्या सहभागाची गरज यावर चर्चा करण्यात आली. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी शाश्वत जीवनशैली, पर्यावरणपूरक सवयी आणि स्थानिक पातळीवर राबवता येणाऱ्या उपाययोजनांवर विशेष भर देण्याविषयी भाष्य करण्यात आले.

या कार्यक्रमाला एसआयईएस महाविद्यालय नेरूळ, डी वाय पाटील महाविद्यालय नेरूळ, स्टर्लिंग कॉलेज नेरूळ, बंट्स महाविद्यालय येथील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी संवर्धनासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत आयोजित '४७ओउ' या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद हा उपक्रम युवा पिढीमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

# ब्रम्हकुमारींतर्फे महाशिवरात्री महोत्सव साजरा

**उरण : वार्ताहर**

प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उरण केंद्र वतीने गुरुवार (दि.१३ ) महाशिवरात्री महोत्सव साजरा करण्यात आला. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्लन करून शिव ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते राजेश शाह ,प्रशांत पुगावकर, पत्रकार दिनेश पवार, लक्ष्मण सेवक, विश्वास भाई, पनवेल सेंटरच्या प्रमुख तारा दीदी, भारतीबेन आदी उपस्थित होते.

ब्रम्हकुमारी यांच्या हस्ते पाहुण्याचे स्वागत करून भेट वस्तू देण्यांत आल्या. भारती बेनने संस्थेचा सविस्तर परिचय करून दिला. तारा दीदी यांनी महाशिवरात्रीचे आध्यत्मिक महत्त्व सांगितले. भारत देशात शिवरात्री सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रत्येक भक्तगण शिव दर्शनासाठी आतुरलेले असतात. त्या दिवशी भक्तगण उपवास, व्रत व जागरण करतात. शिव लिंगावर कडवे फुल वाहतात. ज्या वेळी धर्माची ग्लानी होते. संपूर्ण दुखमय संसार बनतो, प्रत्येक गोष्टीची अती झालेली असते. तणाव, दु;ख, क्लेश, वैरभाव, अश्या घोर अज्ञानाच्या रात्री स्वयं परमपिता परमात्मा शिव जो सर्व आत्म्यांचा पिता आहे.



या सृष्टीवर अवतरीत होउन प्रजापिता ब्रम्हा द्वारे आध्यत्मिक ज्ञान आणि राज योगाचे शिक्षण देवून आत्मिक जागृती करून घेतात आणि पटवून देतात. त्यामुळे मनुष्य परिवर्तनात होवून नारा पासून नारायण व ष्रीपासून लक्ष्मि पदाची प्राप्ती करून देतात. राजयोगाच्या माध्यमातून संपूर्ण विश्वामध्ये शांती स्थापन करून सुखमय संसार बनवितात म्हणून स्वत:ला जाणा, परमात्मा पित्याला जाणा, आताची वेळ कोणती आहे ती जाणा आणि ईश्वराला आपला साथी बनून येणाऱ्या सुखमय संसाराचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त करा. हा शुद्ध संदेश आहे, असे मौलिक विचार पनवेल च्या सेंटर च्या प्रमुख तारा दीदी यांनी सांगितले. कार्यक्रमास ब्रम्हकुमार, ब्रम्हकुमारी परिवार उपस्थित होते.

# कळंबूसरे गावात महाशिवरात्री उत्सवाचा शतक महोत्सव



**उरण : वार्ताहर**

कळंबूसरे गावात यावर्षी महाशिवरात्रीचा शतक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. १९२७ पासून सुरू झालेला कळंबेश्वराचा शिवशंकराचा मोठ्या आनंदात आणि उत्साहात शतक महोत्सव साजरा करण्यात येणार आहे ग्रामस्थ मंडळ कळंबुसरे तर्फे भजन.कीर्तन. हरिपाठ.महाआरती.महाप्रसाद. हे कार्यक्रम होतील.

तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या खेळण्यांची दुकाने.आकाश पाळणे. मिकी माऊस. छोटी ट्रेन. खाऊची मिठाईची दुकाने. अशी सर्व तयारी करण्यात आली आहे १४ फेब्रुवारी रात्री किर्तन. १५ फेब्रुवारी मोठ्या उत्साहात महाशिवरात्री उत्सव साजरा होणार आहे.

१६ फेब्रुवारीला किर्तन तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे यावर्षी कळंबुसरे गावातील महाशिवरात्री उत्सवाचा शतकमहोत्सव आसल्यामुळे होतकरू तरुण वर्ग व कळंबूसरे ग्रामस्थ यांच्या संकल्पनेतून प्रचंडमेहनत घेतली आणि आर्थिक फंडाची व्यवस्था उत्तमरीत्या पार पाडली. या वर्षी महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा व्हावा म्हणून सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ठीक ९ वाजता मराठी पाऊल पडते पुढे. महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचा महाकला आविष्कार. कार्यक्रम आयोजित केला आहे. कळंबुसरे गावातील सर्व तरुण वर्ग आणि ग्रामस्थ मंडळ यांच्यातर्फे सर्वांना आग्रहाचे निमंत्रण. डी. आर. पाटील सर.कळंबुसरे ग्रामस्थ यांनी सांगितले.

# कामोठे येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथे नागरिकांमध्ये पोलिस प्रशासन तसेच कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासाठी तसेच त्यांचे हक्क व अधिकार याबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस स्टेशन आणि दिशा महिला मंच वकील संघटना पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून विमल बिडवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कामोठे पोलीस स्टेशन, मनोहर पगार पोलीस निरीक्षक (क्राईम), कामोठे तसेच ॲड. रत्नदीप पाटील, अध्यक्ष, पनवेल वकील संघटनना यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले.



पोलिस आणि नागरिक यांच्यात विश्वास, पारदर्शकता आणि सहकार्याचे भक्कम नाते निर्माण झाले तरच समाज खर्या अर्थाने सुरक्षित राहू शकतो. भीती नव्हे तर विश्वास हीच पोलीस व्यवस्थेची ताकद आहे. महिलांनी, ज्येष्ठ नागरिकांनी आणि पालकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून कायद्याचा योग्य वापर करणे अत्यावश्यक आहे. वेळोवेळी जनता व पोलीस यांच्यात सकारात्मक संवाद घडावा आणि जनतेत कायद्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी कामोठे पोलीस स्टेशन सातत्याने जनजागृती उपक्रम राबवत आहे आणि भविष्यातही कटिबद्ध राहील, असे मत सन्मानिय विमल बिडवे यांनी व्यक्त केले.

न्याय हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थिती किंवा अज्ञानामुळे कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, हीच विधी सेवा समितीची भूमिका आहे. गरजू नागरिकांना मोफत कायदेशीर मदत, सल्ला आणि मार्गदर्शन देण्यासाठी शासनाने विविध योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिकांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवून कायद्याचा योग्य वापर करावा आणि कोणतीही अडचण असल्यास निर्धास्तपणे विधी सेवा समितीकडे संपर्क साधावा, असे मत रत्नदीप पाटील यांनी व्यक्त केले.

समाज सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. पालकांनी आपल्या मुलांशी संवाद वाढवून त्यांना योग्य संस्कार व मार्गदर्शन दिले, तर अनेक गुन्हे टाळता येऊ शकतात. कामोठे पोलीस स्टेशन नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. भीती न बाळगता विश्वासाने पोलिसांशी संपर्क साधन्याचे आवाहन पोलीस निरीक्षक क्राइम मनोहर पगार यांनी केले. कार्यक्रमादरम्यान तालुका विधी सेवा समितीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

# बिबट्याच्या दर्शनाने भीतीचे वातावरण

## खोपोलीतील सायमाळ परिसरात वनविभागाकडून जनजागृती



**चौक : प्रतिनिधी**

जुना मुंबई-पुणे रस्त्यावर खोपोली सायमाळ या ठिकाणी बिबट्याने दर्शन दिल्याने परिसरात घबराट निर्माण झाली असून वनक्षेत्रपाल खालापूर राजेंद्र पवार यांनी जनजागृती केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवर टाटा पावरहाऊस येथे सह्याद्री डोंगर परिसरात बिबट्याने पुन्हा दर्शन दिल्याने नागरिकांच्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी बिबट्याचे दर्शन झाले होते. वनविभाग परिक्षेत्र खालापूर आणि खोपोली यानी खबरदारी घेण्याचे आवाहन करणारे फलक जागोजागी लावले आहेत.

दोन महिन्यांपूर्वी खोपोली शहरातील डोंगर टेकडीवरून पटेल नगर येथील वस्तीत बिबट्याचा वावर दिसून आला. बिबट्याच्या पायाचे ठसेदेखील होते. त्यानंतर पुन्हा दोन दिवसांपूर्वी जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर डोंगराळ भागातील सायमाळ या टाटा पॉवर हाऊस भागात रात्रीच्या वेळी सीसीटीव्हीमध्ये बिबट्याचा वावर आढळून आला आहे.

या परिसरात खोल दरी आणि घनदाट जंगल असल्याने बिबट्याचा अधिवास असण्याची शक्यता आहे. वनपाल खोपोली, वनरक्षक चंदन नागरगोजे, घुटे, गायकवाड यांनी सायमाळ खोपोली परिसरात बिबट्याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली. त्यांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# बोरघाटात ब्रेक फेल टेम्पो हाईट बॅरिकेडला धडकला; दोन जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटातील अंडा पॉइंटजवळ शुक्रवारी रात्री ९च्या सुमारास पुण्याकडून मुंबईकडे हेवी पाईप वाहून नेणारा टेम्पो हाईट बॅरिकेडला धडकला. या अपघातात दोन कार बाधित झाल्या आणि दोन जण जखमी झाले आहेत.

अपघातग्रस्त टेम्पोतील पाईप दोन कारवर पडल्याने त्या दबल्या गेल्या. दोन्ही कारमधील प्रवासी किरकोळ जखमी झाले. एका कारमधील चालक अडकला होता. आयआरबी पेट्रोलिंग, हेल्प फाउंडेशन, घाटात काम करणारे मेकॅनिक्स, क्रेन ऑपरेटर्स, महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाट, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल आणि स्थानिक तसेच प्रवाशांच्या मदतीने चालक आणि प्रवाशांना सुखरूप बाहेर काढून पुणे पवना येथील लोकमान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दुसऱ्या अपघातात तीन वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात पहाटे ४च्या सुमारास खालापूर टोल नाका परिसरात घडला.



# पोलादपुरात दुचाकी घसरून तरुण जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वर महाडकडून खेडच्या दिशेने जाताना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयासमोर काळ्या रंगाच्या बुलेट मोटरसायकलवरील नियंत्रण सुटून घसरल्याने २८ वर्षीय तरुण जखमी झाला. हा अपघात बुधवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास झाला असून तरुणाचा हात मोडल्याची माहिती प्राप्त झाली आहे.





पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामधील कोंडीवडे गावात राहणारा विश्वनाथ एकनाथ पार्टे हा तरूण नवीन हेविवेट बुलेट (नंबरप्लेट नाही) मोटरसायकल घेऊन हे खेडच्या दिशेने जात असताना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयासमोर नियंत्रण सुटून तो रस्त्यावर आदळला. या अपघातात त्याचा उजवा हात मोडला आहे.

पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी अनुज शुक्ला यांनी जखमी तरुणावर प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी महाड येथे पाठविले. या अपघाताची माहिती समजताच पोलादपूर शहरातील स्थानिक तरुण व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.

# एनएमएमटीच्या नादुरूस्त बसमुळे प्रवासी त्रस्त

**चौक : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे रोजच्या प्रवासीवर्गात नाराजीचा सूर उमटत आहे. दररोज या मार्गावर एखादी बस बंद पडलेली नजरेत दिसते.



एनएमएमटी परिवहन विभागाच्या बेलापूर किंवा वाशी येथून खोपोली, रसायनी व कर्जत येथे येणाऱ्या व तिथे जाणाऱ्या नागरिकांसाठी ही बस सुरू करण्यात आली आहे. या बससेवेमुळे विद्यार्थी, नागरिक, महिला, कामगार, रुग्ण व अन्य प्रवासी यांनाही सेवा खूप सोयीची आहे. त्यामुळे अनेक प्रवासी या बससेवेवर अवलंबून आहेत, अथवा असतात, पण जेव्हापासून ही बससेवा सुरू झाली, तेव्हापासून जुन्या, मोडकळीस, नादुरुस्त बस गाड्या सोडल्या जातात. त्यामुळे या मार्गावर ही बससेवा उभी असल्याचे दिसून येते. पावसाळ्यात खिडक्यांना तावदाने नसतात, गाडीच्या काचा फुटलेल्या असतात, गाडीचा भयानक आणि भयंकर आवाज असतो, बसण्याची जागा नीट नसते असे नियमित प्रवास करणारे प्रवाशी सांगतात.

एमएच ४३ बीपी ७७३५ या क्रमांकाची बस खोपोलीकडे जात असताना वावंढळ हद्दीत साधारण पाच वाजता पुला जवळ भर रस्त्यावर बंद पडली. ही बस प्रवासी यांनी भरलेली होती. बस बंद पडल्याची आणि पुन्हा सुरू होणार नाही असे चालकाने सांगितल्यावर सर्वच बाहेर पडले, यात रोजंदारीवर काम करणारे कामगार, नियमित कामावर जाणारे, शाळा, कॉलेज विद्यार्थी, क्लाससाठी जाणारे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक यांचाच प्रवास होता. ज्या ठिकाणी गाडी बंद पडली ते क्षेत्र अपघातग्रस्त असून तिथे तसा उल्लेख आहे. सायंकाळ होत असताना काळोख पडू लागला व येणाऱ्या प्रत्यक गाडीला प्रवासी थांबण्याची विनंती करीत होते, ज्यामुळे लवकर घरी जाता येईल, तर इथून पुन्हा चाळीस रुपयांचे नुकसान नको म्हणून काही प्रवासी बसची वाट पाहत राहिले.

या दरम्यान प्रवासी रस्त्याने धावाधाव करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असताना याच मार्गावर कर्तव्य बजावणारे वाहतूक पोलीस मुलाणी, विनोद पाटील व राजेंद्र बर्गे यांनी प्रवाशांना कडेला उभे केले व बसही रस्त्याच्या कडेला उभी केली. अंधार होत असल्याने त्यांनी सर्व प्रवासी जात नाहीत तोपर्यंत तिथून जायचे नाही असे मनात धरून आपले कर्तव्य बजावले. साधारण सव्वा तासाने नवी मुंबई महापालिकेची खोपोलीकडे जाणारी बस आली. राहिलेले सर्व प्रवासी त्यात बसवून देण्यात आले. दरम्यान, खोपोली, कर्जत व रसायनी येथे येणाऱ्या गाड्या सुस्थितील पाठविण्यात याव्यात, अशी मागणी प्रवासी संघाने केली आहे.

# नरवीरांचे शौर्य, त्याग आणि निष्ठा भविष्यकाळात मार्गदर्शक -मंत्री गोगावले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यनिर्मितीसाठी ज्यांनी जिवाची पर्वा न करता प्राणांची बाजी लावली म्हणूनच राजे 'छत्रपती' झाले आणि हिंदवी स्वराज्याची भक्कम स्थापना घडून आली. अशांपैकी नरवीर तानाजी मालुसरे यांचे शौर्य, त्याग आणि स्वामीनिष्ठा आगामी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, असे उदगार मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केले.

सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे यांच्या ३५६ व्या शौर्यदिन व पुण्यतिथीनिमित्त रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती पोलादपूर आणि नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, उमरठ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे दोनदिवसीय सोहळा साजरा झाला.

या वेळी बोलताना मंत्री गोगावले यांनी, कार्यकर्त्यांमध्ये फायद्यासाठी निष्ठा गहाण टाकण्याची भूमिका पाहता भावी पिढीसाठी निष्ठेचे उदाहरण म्हणून नरवीर तानाजी अजरामर असल्याचे सांगितले.

या सोहळयास उत्सव समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कळंबे, उद्योजक रामदास कळंबे, प्रमोद घोसाळकर, अनिल मालुसरे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले यांच्यासह अन्य जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांनीही उपस्थित राहून नरवीरांच्या समाधीसमोर नतमस्तक होत अभिवादन केले.

या वेळी नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नवनिर्वाचित सदस्य व मान्यवरांचा नरवीर तानाजी मालुसरे यांची प्रतिमा प्रदान करून सन्मान करण्यात आला.

# लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा होणार ऑनलाईन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदाकरिता टिसीएस-आयओएन यांच्यामार्फत १४ मार्च २०२६ रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत ऑनलाईन परीक्षा होणार आहे.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत्त) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग यांनी ही ऑनलाईन परीक्षाबाबतची माहिती सर्वांना दिली.

# चौलचे पुरातन रामेश्वर मंदिर



नारळ पोफळीच्या गर्द छायेत विसावेलेले चौल हे नयनरम्य गाव, अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्तावर असून अलिबाग पासून १८ किमी अंतरावर आहे. इ.स. पूर्व पाचव्या शतकापासून चौलचा एक व्यापारी केंद्र असा उल्लेगख आढळतो. चौल हा पूर्वी १५ पाखाड्यामध्ये विभागलेला होता, या १५ पाखाड्यांपैकी भोरसी पाखाडीत चौलचे ग्रामदैवत श्रीरामेश्वेर मंदिर आहे.

चौलचे श्रीरामेश्वेर मंदिर चारशे वर्षांपूर्वीचे असावे असा अंदाज बांधण्यात येतो. इटायिन प्रवासी डेलाव्हॅली यांनी या मंदिरास इ.स. १६२५ साली भेट देऊन सदर मंदिराचा उल्लोख अतिशय पूजनिय मानलेले देवालय असा केला आहे. श्री रामेश्वर हे स्वयंभू देवस्थान असल्याने तेथे त्या काळी गावकऱ्यांनी सर्व साधारण घुमट बांधलेली नोंद सापडते. तसेच आजूबाजूचे मंदिर हे गवताचे, छपराचे शाकारलेले असल्याचे नोंद ग्रुपग्रामपंचायत चौल दत्परी असेंसमेंट ५६७ ने आजमितीस आहे हे विशेष होय, परंतु हे मंदिर कोणी व केव्हा बांधले यांचा उल्लौख मिळत नाही. मंदिराची दुरुस्ती अनेकदा झाल्याचे आंग्रेकालीन उल्लेख आहेत.

### त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी दीपोत्सव

मंदिराला लागून सभामंडप असून तो दुमजली आहे. त्यासाठी श्री जोशी व बर्वे कुटुंबीयांनी अर्थ सहाय्य केल्याची नोंद आजही उत्तरेकडील दरवाज्याच्या खांबावर आढळून येते. मंदिर परिसरात मंदिरासमोर नंदी असून त्यावर एक भव्य मोदकाकृती दीपमाळ आहे. समोरील तुलसी वृंदावनाजवळ एक छोटी दीपमाळा आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी व त्रिपुरा पौर्णिमेचे दिवशी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जातो. दीपपूजा करण्याचा मान जयंत जोशी यांचा असून ब्रह्मवृंद म्हणून रघुनाथ पाडुरंग पिटकर हे काम पहातात.

### श्रावणात अखंड हरिनाम सप्ताह

मंदिराच्या पाठीमागील बाजूस सरखेल कान्होजी आंग्रे यांची अलिबागमधील समाधीसारखी प्रतिकृती समाधी आहे. समाधीजवळ चबुतरे कृती गोलाकार थडगी आहेत. महाशिवरात्र व त्रिपौर्णिमेची दिवशी रेवदंडामधील मुकादम व खोत कुटुंबीयांना येथे दीप लावण्याचा मान आहे.

मंदिराचे आग्नेय बाजूस बाहेर श्री सटवाई मातेचे स्थान आहे. तर आंग्नाय दिशेस श्री विठ्ठल रखुमाई असून, जवळ जय विजय दोन गणपती आहे. मंदिराच्या उत्तनरेस आशापरी मातेचे मंदिर असून ती पार्वती रूपात आहे. बाजूला नवग्रह आहेत. श्रीरामेश्ववर मंदिरात श्रावण पहिला सोमवार ते दुसरा सोमवार अखंड हरिनाम सप्ताह असतो. सप्ताहाची समाप्ती झाल्यावर श्रीरामेश्वाराचा छबिना निघतो, तसेच महाशिवरात्र व त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी रात्री श्रीचा छबिना असतो.

### महाशिवरात्रीला पाच दिवस यात्रा

महाशिवरात्रीला रामेश्वसरला पाच दिवस यात्रा भरत असते. मंदिरास देणग्या देण्याची पूर्वपार पध्दत आढळते. पुर्वाभिमुख असलेल्या रामेश्व र मंदिराचा गाभारा सुमारे ४.४२ बाय ४.४२ मीटर असून मध्यभागी १.५० मीटर लांब रूंद व जमिनीपासून थोडी उंच पितळी पत्र्याचे मढवलेली शाळुंका आहे. तिच्या मध्यभागी नेहमीप्रमाणे उंची लिंग नसून चौकोनी खड्डात स्वयंभू मानलेले शिवस्वरूप आहे. गाभाऱ्यात संगमवरी फरशी आहे. गाभाऱ्याच्य जमिनीपासून सुमारे ७.६२ मीटर उंच असलेल्या शिखराचे व संपूर्ण गाभाऱ्याचे बांधकाम दगडी आहे. गाभार्याची संपूर्ण इमारत स्वतंत्र असून ती बाहेरील उंच शिखर असलेल्या घडीव दगडी मंदिरात सामाविष्ट आहे. गाभाऱ्याच्या इमारती पुढील भाग मोठा असून त्यास सभामंडप म्हणतात. याच मंडपात वरील वर्णन केलेली तीन कुंडे आहेत. सभामंडपात प्रवेश करण्यासाठी दर्शनी भिंतीत मध्यभागी मोठा दरवाजा आहे. घडीव दगडात बांधलेले हे मंदिर हेमाडपंथी पध्दतीसारखे वाटते.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# फडके शाळेत 'हॅप्पी स्कूल'

**खोपोली : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लबच्या चार्टर डेनिमित्त वासुदेव बळवंत फडके स्कूल लौजी येथे दुसरा हॅपी स्कूल प्रोजेक्ट यशस्वीरित्या पूर्ण झाला. या हॅपी स्कूलच्या बोर्डचे उद्‌घाटन माजी जिल्हा एडिटर क्षमा आठवले यांनी केले. या कार्यक्रमात क्लबच्या संस्थापक सदस्य इंदू पिल्ले उपस्थित होत्या. उद्‌घाटनानंतर तेथील प्रिन्सिपल मॅडम आणि सहा शिक्षकांना शिक्षक दिनानिमित्त शाल, गुलाबाचे फूल आणि तीन शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन गौरविले.

सर्व विद्यार्थ्यांना क्षमा आठवले यांनी मार्गदर्शन करताना वेळेचा सदुपयोग कसा करावा याची माहिती प्रश्नोत्तरांद्वारे दिली. आम्ही शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खेळाचे साहित्य (कॅरम बोर्ड, दोन शाळेच्या बॅग, दोरी उडी सेट), शाळेच्या भिंती रंगवल्या, स्वच्छता गृह दरवाजे दुरुस्ती, पाणी शुद्धीकरण यंत्र, ग्रंथालय रॅक, पुस्तके,सकस आहार, मोठी कचरा कुंडी, स्मार्ट टीव्ही ३२ इंच, मोराची मोठी फ्रेम इत्यादी वस्तूंचे वाटप केले. तसेच शाळेत वृक्षारोपणसुद्धा केले गेले. या सर्व कामांसाठी अल्टा कंपनीने ही इनरव्हील क्लबला सहकार्य केले आहे.

चार्टर डेनिमित्त सर्व विद्यार्थ्यांना क्लबच्या वतीने राजगिरा लाडू देण्यात आले. या कार्यक्रमासाठी क्लब अध्यक्ष दीना शहा, सचिव मधुमिता पाटील, खजिनदार दीपिका कोठारी, माजी अध्यक्ष जयश्री कलोशी, माजी अध्यक्ष सारिका धोत्रे, आयएसओ वर्षा शिवलकर, सदस्य दिव्या मश्रु, तसेच सदस्य नाझ सय्यद, अरुणा ओसवाल, निशा दळवी, तारा नायडू, सुमिता महर्षी, भारती शहा उपस्थित होत्या तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका प्रियांका भोईर व त्यांचा सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

# चौल शितळादेवी मंदिराचा मंगळवारी वर्धापन दिन सोहळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ग्रामदैवत मानल्या जाणाऱ्या शितळादेवीच्या वर्धापन दिनानिमित्त फाल्गुन शुद्ध दुर्गाष्टमी, मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महापर्वणीच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



वर्धापन दिनानिमित्त पहाटे सकाळी ५.३० वाजता देवीचा स्नानविधी होणार असून पारंपरिक विधी-विधानांनुसार पूजाअर्चा केली जाणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा संपन्न होईल. या पूजेनंतर उपस्थित भाविकांना सकाळी १० वाजता तीर्थप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे तसेच भाविकांसाठी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील ग्रामस्थ तसेच बाहेरगावाहून येणारे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मंदिर परिसरात स्वच्छता, सुव्यवस्था व भाविकांच्या सोयीसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिन सोहळा श्री शितळादेवी जिर्णोद्धार मंडळ व ग्रामस्थ मंडळ, चौल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. परंपरा, श्रद्धा आणि भक्तिभावाचा संगम असलेला हा सोहळा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

महापर्वणीच्या या पावन दिवशी सर्व भाविकांनी देवीचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

# यूएईचा कॅनडावर विजय

## आर्यन, सोहैबची वादळी खेळी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सलामीवीर आर्यन शर्मा आणि सोहैब खान यांच्यातील ८४ धावांच्या धडाकेबाज भागीदारीच्या जोरावर संयुक्त अरब अमिरातीने (यूएई) टी-२० विश्वचषकाच्या सामन्यात कॅनडावर पाच गडी राखून मात केली. सामनावीर जुनैद सिद्दीकीचे पाच बळी आणि फलंदाजांची जिद्द यामुळे यूएईने १५१ धावांचे लक्ष्य १९.४ षटकांत गाठले.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या कॅनडाची सुरुवात खराब झाली. अनुभवी जुनैद सिद्दीकीने सुरुवातीलाच दोन धक्के दिले. कॅनडाकडून हर्ष ठाकर याने एकाकी झुंज देत ४१ चेंडूंत ५० धावांची (दोन चौकार, तीन षटकार) खेळी केली. नवनीत धालीवालने ३४ धावांचे योगदान दिले, मात्र तो दुर्दैवीरीत्या धावबाद झाला. सिद्दीकीने अखेरच्या षटकांतही आपली जादू कायम ठेवत कारकिर्दीतील पहिले पाच बळी (३५ धावांत पाच) पूर्ण केले, त्यामुळे कॅनडा १५० धावांवर रोखला गेला.

१५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ६६ धावांत चार गडी गमावल्यामुळे यूएईचा संघ अडचणीत सापडला होता. कॅनडाच्या साद बिन जफरने (१४ धावांत तीन) टिच्चून गोलंदाजी करत यूएईला रोखले होते. कठीण स्थितीत आर्यन शर्मा (नाबाद ७४) आणि सोहैब खान (५१) यांनी सूत्रे हाती घेतली. विजयासाठी शेवटच्या चार षटकांत ५६ धावांची गरज असताना सोहैबने डीलन हेलिगरला दोन षटकार आणि एक चौकार मारून सामन्याचे चित्र बदलले.

शेवटच्या षटकात आठ धावा हव्या असताना आर्यनने पहिल्याच चेंडूवर षटकार खेचला. सोहैब अर्धशतक पूर्ण करून बाद झाला, तरी आर्यनने शेवटपर्यंत नाबाद राहत संघाला विजय मिळवून दिला. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील यूएईचा हा दुसरा मोठा विजय ठरला आहे. २०२२मध्ये यूएईने नामिबियाला हरवले होते.

## भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ वूमन्स प्रीमियर लीगनंतर आता हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेला आहे. दोन्ही संघांमध्ये टी-२० मालिका, एकदिवसीय मालिका आणि कसोटी सामना खेळवला जाणार आहे. टी-२० मालिकेने या मल्टी फॉरमॅट मालिकेला सुरुवात होणार आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमधील टी-२० मालिकेला रविवार (दि. १५) पासून सुरुवात होत आहे. टी-२० मालिकेनंतर एकदिवसीय मालिका २४ फेब्रुवारी रोजी सुरू होणार आहे. महिला विश्वचषक उपांत्य फेरीनंतर हे दोन्ही संघ एकदिवसीय सामन्यात एकमेकांसमोर येत आहेत. ही मालिका ऑस्ट्रेलियाची महान फलंदाज एलिसा हिलीसाठी शेवटची मालिका आहे.

# पीजेपीएलमध्ये डायमंड डेअरडेव्हिल संघ चॅम्पियन

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या क्रीडांगणावर जैन युथ ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जैन प्रीमियर लीग पर्व पाचवे बॉक्स टाईप क्रिकेट स्पर्धेत किशोर जैन यांच्या डायमंड डेअरडेव्हिल संघाने विजेतेपद पटकाविले. या संघाने अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात पनेश जैन यांच्या धान्यम संघाचा ११ धावांनी पराभव करीत बाजी मारली.




पीजेपीएल स्पर्धेत एकूण सहा संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धा प्रथम लीग व त्यानंतर बाद फेरीनुसार खेळविण्यात आली.संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रीत जैन याला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज रिदेश जैन, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून दिक्षित जैन यांची निवड करण्यात आली.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य मनोज जैन, विक्रम जैन, भरत जैन, किशोर जैन, जितेंद्र जैन, ऋषिकुमार जैन, अशोक जैन यांच्यासह जैन बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

# ओमानच्या खेळाडूचा नवा विश्वविक्रम

■ ४४व्या वर्षी वर्ल्डकपमध्ये ठोकले अर्धशतक



**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सामन्यात आयर्लंडच्या संघाने यंदाच्या हंगामातील सर्वोच्च धावसंख्या उभारत ओमानच्या संघाला ९६ धावांनी पराभूत करत सामना जिंकला, पण धावांचा पाठलाग करताना ओमानच्या अमिर कलीम याने आपल्याच सहकाऱ्याचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडत नवा इतिहास रचला आहे.

याआधी ओमानच्या ताफ्यातील मोहम्मद नदीम ४३ वर्षे आणि १६१ दिवस वय असताना टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सर्वात वयस्कर अर्धशतकवीर ठरला होता. आता हा विक्रम आमिर कलीमच्या नावे झाला आहे. कोलंबोच्या मैदानात त्याने ४४ वर्षे ८६ दिवस वय असताना अर्धशतक झळकावले आहे. त्याची ही विश्वविक्रमी कामगिरी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही, पण त्याने वय फक्त आकडा हे दाखवून देताना सनथ जयसूर्या, शोएब मलिक आणि तिलकरत्ने दिलशान या दिग्गजांनाही मागे टाकले आहे.

आयर्लंडच्या संघाने निर्धारित २० षटकात पाच विकेट्सच्या मोबदल्यात २३५ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना सलामीवीर अमीर कलीम याने २९ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ५० धावांची खेळी केली. तो टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सर्वात वयस्कर अर्धशतकवीर ठरला. त्याच्याशिवाय हम्मद मिर्झाने ३७ चेंडूत केलेल्या ४६ धावांची खेळी वगळता ओमानच्या संघातील एकालाही मैदानात तग धरता आला नाही. परिणामी संघाचा डाव १८ षटकात १३९ धावांवर आटोपला.

# झिम्बाब्वेचा सुपरमॅन! टोनी मुनीयोंगाने टिपला अफलातून झेल

**कोलंबो : वृत्तसंस्था**

सर्वाधिक वेळा क्रिकेट विश्वचषक जिंकलेल्या बलाढ्य ऑस्ट्रेलियाला तब्बल १९ वर्षांनी पुन्हा एकदा लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या ब गटात झिम्बाब्वेच्या संघाने त्यांना २३ धावांनी पराभूत केले. या सामन्यात टोनी मुनीयोंगाने घेतलेला झेल विशेष चर्चेत राहिला.



१७० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या मॅट रेनशॉने झुंजार अर्धशतकी खेळी केली. त्याने ४४ चेंडूत ६५ धावा केल्या. ग्लेन मॅक्सवेलही ३१ धावांवर बाद झाला. दुखापतग्रस्त मार्कस स्टॉयनीसही (६) स्वस्तात बाद झाला. त्यानंतर बेन ड्वारशूएसने मोठा फटका खेळायचा प्रयत्न केला. त्याचा फटका चुकला. त्यावेळी टोनी मुनीयोंगाने हवेत झेप घेत झेल घेतला. त्यामुळे झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाचा पराभव करीत दोन गुण कमावले.

# इंटरनॅशनल किकबॉक्सिंग स्पर्धेत रोणाल पाटीलला दोन रौप्यपदके





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पाचव्या इंडिया ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग कप २०२६ स्पर्धा नुकतीच नवी दिल्ली येथे पार पडली. विविध देशांतील खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील केवाळे गावचा रोणाल महेश पाटील याने उल्लेखनीय कामगिरी करत दोन रौप्यपदके पटकावली.


३२ किलो वजन गटात भारताकडून खेळताना महाराष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या रोणालने जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा आणि खेळाप्रती असलेल्या निष्ठेच्या जोरावर रुपेरी कामगिरी केली. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोणालच्या यशाचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, रोणालसारखे खेळाडू पनवेलची क्रीडा परंपरा अधिक समृद्ध करत असून भविष्यात तो आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उंचावेल.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

रोणालला मुख्य प्रशिक्षक निलेश भोसले, कोच योगेश बईकर आणि संपूर्ण टीमचे मार्गदर्शन लाभले. रोणालच्या कामगिरीबद्दल भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील आणि नगरसेवक अजय बहिरा यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# पराभव निराशाजनक, पण हा खेळाचाच एक भाग -ट्रॅव्हिस हेड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयसीसी टी -२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत पहिला मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. सिकंदर रझाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या झिम्बाब्वेने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला धूळ चारली आहे. ऑस्ट्रेलियावर २३ धावांनी विजय मिळवून झिम्बाब्वेने सुपर ८मध्ये प्रवेश करण्याचा मार्ग सोपा केला आहे. दरम्यान, या पराभवानंतर ऑस्ट्रेलियाचा कर्णधार ट्रॅव्हिस हेडने पराभवाचे नेमके कारण सांगितले आहे.

सामना गमावल्यानंतर कर्णधार हेड म्हणाला, विकेट तर चांगली होती, पण पॉवरप्लेमध्ये विकेट्स गमावल्यामुळे आम्ही दबावात आलो. मी म्हटल्याप्रमाणे विकेट्स गेल्यानंतर आमच्यावरील दबाव वाढला. मधल्या षटकांमध्ये आम्ही चांगली भागीदारी केली. ओम शेवटच्या काही षटकांमध्ये आम्ही खूप जास्त धावा शिल्लक ठेवल्या. क्रिकेटमध्ये हे घडते. हा पराभव निराशाजनक आहे, पण हा खेळाचाच एक भाग आहे.

तो पुढे म्हणाला की, स्पर्धेत दुखापती होणे आणि त्यातून मार्ग काढणे ही सामान्य गोष्ट आहे. या स्पर्धेत सर्वच संघ ताकदवान संघ आहेत. त्यामुळे अतिशय अटीतटीचे सामने पहायला मिळत आहेत. आम्ही याआधीही अशा परिस्थितीत सापडलो होतो. आमच्या ड्रेसिंग रुममध्ये काही खेळाडू आहेत, ज्यांनी २०२३मध्ये अशा परिस्थितीचा सामना केला होता आणि शेवटी आम्ही यश मिळवले होते.

ऑस्ट्रेलियाने गेल्या सामन्यात विजय मिळवला आहे. त्यामुळे हा सामना गमावल्यानंतर ऑस्ट्रेलियाला सुपर ८मध्ये जाण्यासाठी पुढील दोन्ही सामने जिंकणे गरजेचे असणार आहे, तर झिम्बाब्वेचा हा या स्पर्धेतील सलग दुसरा विजय ठरला आहे. उर्वरित दोनपैकी एक सामना जिंकून झिम्बाब्वेकडे सुपर ८मध्ये प्रवेश करण्याची संधी असणार आहे.

# हॉटेलचे बिल न भरल्याने पाकिस्तानी हॉकी टीमची फजिती

**कॅनबरा : वृत्तसंस्था**

पाकिस्तानची जरभरात नेहमी फजिती होत असते. याची अनेक उदाहरणे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. पाकिस्तान संघाचा किंवा त्यांच्या प्रशासनाचा वेंधळेपणा हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. आता पाकिस्तानच्या हॉकी टीमसोबत एक लाजीरवाणी गोष्ट घडली आहे. ऑस्ट्रेलियातील कॅनबरामध्ये हॉटेलचे देणे न भागवल्यामुळे त्यांचे बुकिंग रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे खेळाडूंना रस्त्यावर भटकत रहावे लागले.






ही घटना एफआयएच प्रो लीगच्या दुसऱ्या फेरीदरम्यान घडली. पाकिस्तानी संघ हॉबार्टमध्ये सामना खेळण्यासाठी पोहचला होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार टीम आणि अधिकाऱ्यांनी फोर स्टार हॉटेल बुकिंग केले होते. त्यांना या हॉटेलचे भाडे पाकिस्तान हॉकी फेडरेशन आणि पाकिस्तान स्पोर्ट्स बोर्डाने केले असल्याचे सांगण्यात आले, मात्र ज्यावेळी खेळाडू कॅनबरा येथे पोहचले. त्यावेळी त्यांना हॉटेल प्रशासनाने तुमचे कोणतेही बुकिंग नाहीये असे सांगितले. तुमच्या बुकिंगचे कोणतेही पैसे आलेले नाहीत, असेही प्रशासनाने सांगितले.

दरम्यान, संघाच्या प्रशिक्षक ताहिर जमा यांनी पाकिस्तानी अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र वेळ, अंतर आणि कथित पैशाची कमी यामुळे अनेक तास कोणताच तोडगा निघाला नाही. मोठ्या प्रवासानंतर खेळाडूंकडे विश्रांतीसाठी कोणतीच जागा नव्हती. त्यांच्या खाण्या-पिण्याची कोणतीच सोय नव्हती. शेवटी मोठ्या प्रयत्नानंतर हॉटेलमध्ये त्यांना काही रूम्स मिळाल्या. रूम्स कमी असल्यामुळं एका रूममध्ये दोन ते तीन खळाडूंना थांबावे लागले. पुढच्या दिवशी संघ थेट मैदानावर उतरला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा २-३ असा पराभव केला.

पाकिस्तानी खेळाडूंना अपमानाचा सामना करण्याची ही काही पहिली वेळ नाही. अर्जेंटिनामधील प्रो लीगच्या पहिल्या फेरीतदेखील खेळाडूंना दिवसाचा भत्ता वेळेत मिळत नव्हता. त्यामुळे परदेशात खेळाडूंना अर्थिक तंगीचा सामना करावा लागला होता.

**संघाला मॅनेजरही नाही!**

पाकिस्तानची हॉकी टीम या वेळी त्यांच्या नियमित मॅनेजरशिवाय ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेली आहे. माजी ऑलिंपियन अंजूम सईद यांना त्यांच्या एका वादग्रस्त वक्तव्यानंतर हटवण्यात आले होते. विमानात धुम्रपान आणि एअरपोर्ट सुरक्षा रक्षकासोबत कथित वाद घातल्यामुळे त्यांना हटवण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

# चिन्नास्वामी स्टेडियममध्ये तीन दिग्गजांच्या नावाचे स्टँड

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने (केएससीए) बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियममधील दोन स्टँडना भारताचे दिग्गज क्रिकेटपटू राहुल द्रविड व अनिल कुंबळे यांची नावे दिले आहेत, तर महिला क्रिकेटपटू शांता रंगास्वामी यांचेदेखील नाव देण्यात आले आहे. भारताचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या तिघांनी आपल्या शानदार कारकिर्दीत देशांतर्गत क्रिकेटमध्ये कर्नाटक संघाकडून खेळताना याच मैदानावर अनेक सामने गाजवले होते. स्टँन्डसच्या ओपनिंग सोहळ्यासाठी हे तिघेही उपस्थित होते.

राहुल द्रविड या कार्यक्रमादरम्यान बोलताना भावूक झालेला पहायला मिळाले. या वेळी द्रविडने त्याच्या कारकिर्दीतील आठवणींना उजाळा दिला. तो म्हणाला, हा सन्मान माझ्या कुटुंबासाठी खूप महत्त्वाचा आहे. माझ्या वडिलांना क्रिकेटची प्रचंड आवड होती आणि त्यांनीच माझ्या मनात या खेळाबद्दल प्रेम निर्माण केले. ते मला इथे अनेक सामने पहायला आणायचे. केवळ कसोटी सामनेच नव्हे, तर रणजी ट्रॉफीचे सामनेही आम्ही एकत्र पाहायचो.

## हे मैदान माझ्यासाठी दुसऱ्या घरासारखे -द्रविड



द्रविडने पुढे म्हटले, आज शांता रंगास्वामींसारख्या व्यक्तीसोबत गौरव होत असल्याचा मला विशेष आनंद आहे. त्यांनी महिला क्रिकेटसाठी मोठे योगदान दिले आहे. आज सर्व क्षेत्रांतील महिला क्रीडाक्षेत्राची झालेली प्रगती पाहता, त्याचे मोठे श्रेय शांता रंगास्वामींसारख्या अग्रणी खेळाडूंना जाते, कारण त्यांनी त्या काळात क्रिकेट खेळले, जेव्हा या देशात महिलांसाठी खेळणे आणि विशेषतः क्रिकेट खेळणे खूप कठीण होते.

द्रविडने नमूद केले की, हे मैदान माझ्यासाठी दुसऱ्या घरासारखे राहिले आहे. अनिलने सांगितल्याप्रमाणे, कदाचित आम्ही आमच्या घरापेक्षा इथेच जास्त वेळ घालवला आहे. इथे मला अपार आनंदाचे क्षण मिळाले, कधी काही मोठ्या निराशाही अनुभवल्या, पण या ठिकाणाने मी आज आहे ते घडवले आहे. केएससीए आणि या महान, ऐतिहासिक मैदानाने मला आयुष्यात जे काही दिले आहे, त्याबद्दल मी सदैव ऋणी राहीन. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

### ही अभिमानाची बाब -अनिल कुंबळे

*अनिल कुंबळेनेही आनंद व्यक्त करत सांगितले की, राहुल द्रविड आणि माजी भारतीय महिला संघाच्या कर्णधार शांता रंगास्वामी यांच्याही नावाने स्टँडला नाव देण्यात आले, ही अभिमानाची बाब आहे. कुंबळे म्हणाला, माझा सहकारी राहुल द्रविड आणि शांता रंगास्वामी यांना कर्नाटक तसेच भारतीय क्रिकेटसाठी दिलेल्या मोठ्या योगदानाबद्दल सन्मानित करण्यात येत आहे, ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे. तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार!*

अनिल कुंबळे भारतासाठी कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज आहे, तर राहुल द्रविड हा कसोटी क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकरनंतर सर्वाधिक धावा करणारा दुसऱ्या क्रमांकाचा फलंदाज आहे. शांता रंगास्वामी या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या पहिल्या कर्णधार होत्या आणि त्यांनी १९७६ ते १९८४ दरम्यान कसोटी संघाचे नेतृत्व केले. तिघांचाही उचित सन्मान करण्यात आला.

# वीरेंद्र सेहवागची 'ती' पोस्ट तुफान व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी टी -२० वर्ल्डकप स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. एका साखळी सामन्यात झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला पराभूत करून सर्वात मोठा उलटफेर केला आहे. झिम्बाब्वेने हा सामना २३ धावांनी आपल्या नावावर केला. या सामन्याचा निकाल लागताच माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागने शेअर केलेली एक पोस्ट सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.



या पोस्टमध्ये सेहवागने भारतीय संघाला विजेता घोषित केले आहे.झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला हरवण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी देखील वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाला झिम्बाब्वेकडून पराभवाचा सामना करावा लागला आहे. १९८३मध्ये झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत झिम्बाब्वेने पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाला धूळ चारली होती. त्यानंतर २००७मध्ये झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला दुसऱ्यांदा पराभूत केले.

मुख्य बाब म्हणजे जेव्हा जेव्हा झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला पराभूत केले आहे, तेव्हा भारताने जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे. वीरेंद्र सेहवागने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये भारतीय संघ यंदाही चॅम्पियन बनू शकतो, असा योगायोग सांगितला आहे. वनडे वर्ल्डकप १९८३ स्पर्धेत झिम्बाब्वेने ऑस्टेलियाला पराभूत केले होते. या स्पर्धेत कपिल देवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारताने वेस्ट इंडिजला हरवून पहिल्यादांच जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती.

यानंतर २००७मध्ये झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला पराभूत केले होते. या स्पर्धेत भारताने पाकिस्तानला पराभूत करून जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती. आता पुन्हा एकदा झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला पराभूत केले आहे. या वेळी पुन्हा एकदा योगायोग जुळून येणार का? भारतीय संघ पुन्हा एकदा जेतेपदाची ट्रॉफी उंचावणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com